# संपादकीय

लॉकएसएस - ग्रंथ हे सर्वत्र उपलब्ध करून द्यायला हवेत.

संगणकाचा डीटीपीसाठी उपयोग सुलभ झाल्यावर ई-बुक्स, इलेक्ट्रॉनिक बुक्स या संकल्पनेने संशोधकांच्या कल्पनाशक्तीला आणि प्रतिभेला आव्हान दिले आहे. छापील पानांच्या बांधीव जुडग्याच्या रुपातील पुस्तक हा प्रकार गुटेनबर्गच्या काळापासून मानवाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला; परंतु आता कागद-छपाई या प्रक्रियांचा संबंध नसलेल्या ई-बुक्स जमाना आणायचा आहे अशा जिद्दीने काही संशोधक कामाला लागले आहेत. ई-बुक्सचे काही प्रयोग आतापर्यंत बाजारात आलेही, परंतु ते सर्वसामान्य व्हावे इतकेच स्वस्त वा सुलभ नव्हते. त्यामुळे लोकांनी त्यांना उचलून धरले नाही. व्यापारी दृष्ट्या त्यांना यश लाभले नाही. परंतु त्यामुळे संशोधकांनी निराश होऊन या कल्पनेकडे पाठ फिरवलेली नाही. 'ई-बुक्स' ही कल्पना उत्तम असून आज ना उद्या ई-बुक्सचीच सद्दी असणार आहे अशी खूणगाठ मनाशी बाळगून जगभरचे संशोधक त्या दिशेने आपल्या संशोधनात गढलेले आहेत. डिजिटल लायब्ररी, सीडी-रॉमच्या स्वरुपातील संहिता वगैरे कल्पनांवरही काम चालू आहे. ग्रंथालयाच्या परंपरागत चौकटीतही त्यामुळे बदल होणे अपरिहार्य ठरले आहे. केवळ छापील वा हस्तलिखित पुस्तकांचा संग्रह करणे आणि विशिष्ट वर्गणी घेऊन वा मोफत-वाचकांना पुस्तके उपलब्ध करून देणे एवढेच ग्रंथालयाचे काम-ही कल्पना आता मागे पडली असून, ग्रंथालय म्हणजे ज्ञानमाहिती केंद्र, नॉलेज सेंटर ही कल्पना आता मूळ धरत आहे. तेथे उपलब्ध असणाऱ्या ज्ञानाला त्यामुळे मर्यादा असणार नाही. नोकरीच्या संधीपासून अणुबाँबच्या निर्मितीपर्यंत कुठल्याही गोष्टीची माहिती तेथे मिळायला हवी. अशा प्रकारे आता ग्रंथालयांमध्ये ज्ञानाचा संचय व्हावा अशी अपेक्षा आहे. संगणकामुळे, इंटरनेटमुळे हे स्वप्न आता आटोक्याबाहेरचे उरलेले नाही. नालंदा-तक्षशिला येथील एकेकाळची ग्रंथालये जाळून नष्ट करण्यात आली आणि भारताच्या ज्ञानपरंपरेतील अनेक महत्वाचे दुवे त्यामुळे नाहीसे झाले. त्या ग्रंथ निविष्ट ज्ञानापासून आपण वंचित झालो.

हा ज्ञानाचा ठेवा मधल्या काळात अस्तंगत झाला. रामायण-महाभारतात उल्लेख केलेल्या तंत्रज्ञानाकडे (पुष्पक विमान, अवकाशातून उड्डाण, मयसभा, शस्त्रे-अस्त्रे, सेतुबंधन शास्त्र इ.) केवळ अद्भुतकथा म्हणून पाहण्यापलीकडे आणि पारायणापलीकडे आपल्याला काही काम उरले नाही.

ग्रंथालयाचा मध्ययुगात विध्वंस करणारे तथाकथित राज्यकर्ते हे लुटारू आणि ज्ञानशत्रू होते. रानटी व अप्रगत होते. परंतु आजच्या प्रगतीच्या युगातही अण्वस्त्र स्फोटाने सारे काही



बेचिराख होऊ शकते आणि ग्रंथालये, प्रयोगशाळा, कारखाने वगैरेंना धोका पोचू शकतो. पुन्हा माणूस हा आदिम अवस्थेत जाऊ शकतो. अशी शक्यता काही विचारवंतांना भेडसावत असते; आणि त्या धोक्यापासून, अरिष्टापासून ज्ञान, तंत्रज्ञान आणि निसर्ग-पर्यावरण यांचा बचाव कसा करावा याबद्दलचे त्यांचे विचारमंथन चालू असते.


अशा एका प्रकल्पाकडे जागरूक वाचकांचे लक्ष वेधावेसे वाटते.

स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीतील ग्रंथपाल विकी रीच आणि संशोधक डेव्हिड रोझेन्थाल यांनी सध्याच्या उपलब्ध तंत्रज्ञानाच्या आधारे आजची ग्रंथसंपदा ही आगामी शेकडो वर्षातही अखंड उपलब्ध राहील या दिशेने काय करावे याबद्दल आपली व्यूहरचना प्रकट केली आहे. त्यांच्या प्रकल्पाला 'लॉटस ऑफ कॉपीज् कीप स्टफ सेफ' या मध्यवर्ती सूत्राच्या आद्याक्षरांनी बनलेले थ्थ्ण्ख्ग्ए लॉक एसएस हे नाव त्यांनी दिले आहे. मुद्रित स्वरूपातील पुस्तके व नियतकालिके जपण्यासाठी त्यांना इलेक्ट्रॉनिक रुपात परिवर्तित करावे लागेलच; परंतु त्याचबरोबर सध्या इलेक्ट्रॉनिक रूपातच प्रसिद्ध होणाऱ्या जर्नल्सच्या संदर्भात काहीतरी करायला हवे असेही या जोडगोळीचे म्हणणे आहे. कारण इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहिती ही काही काळाने काढून टाकण्यात येते आणि ती पुन्हा नंतर मिळवणे हे अवघड होत जाते. डिजिटल बॅकअप किंवा सीडी-रॉम या स्वरूपात त्यांचे जतन करणे हेही अर्थात सुलभ आहे; आवश्यकही आहे. 'लायब्ररी ऑफ काँग्रेस इन अमेरिका' या जगातील सर्वात मोठ्या ग्रंथालयात उपलब्ध सर्व पुस्तकांचा संग्रह करण्यावर कटाक्ष असतो. अन्यत्र कुठेच एखादे पुस्तक न मिळाले तर शेवटी ते या ग्रंथालयातून मिळवावे, तेथे ते नक्की मिळेल अशी संशोधकांची खात्री असते. सीडी-रॉम, टेप्स किंवा हार्डड्राइव्ह यांचा दर्जाही काळाच्या ओघात कमी कमी होत जातो ही वस्तुस्थिती अर्थात लक्षात घ्यायलाच हवी.

लॉकएसएसने याबाबत आजच्या ग्रंथालयाच्याच कार्यपद्धतीच्या आधारे आपले नवीन सॉफ्टवेअर बनवले आहे. पुस्तकांचा संग्रह करणे, ती वाचकांना उपलब्ध करून देणे, त्यांची देखभाल करणे, ती जतन करणे हरवली तर दुसरी प्रत मिळवणे वा इतर ग्रंथालयाकडून ती मिळवणे व त्यांची कॉपी करून जतन करणे - हीच प्रक्रिया याबाबतीत राबवण्यात येते. प्रत्येक ग्रंथालयाने स्वत:च्या संग्रहातील पुस्तके डिजिटल स्वरूपात आणून, ग्रंथालयाचे एक नेटवर्क तयार करणे; त्यात या सॉफ्टवेअरद्वारे नवे पेजेस निर्माण करून त्यात निरनिराळ्या पुस्तकातील व नियतकालिकातील मजकूर साठवत जाणे; जे संग्रही नसेल ते इतर ग्रंथालयांकडून मिळवणे व त्याची कॉपी करून घेणे, ही कॉपी करताना मूळ निर्दोष संहिताच वापरण्यावर कटाक्ष ठेवणे, अशी सर्वसामान्य कार्यपद्धती या प्रक्रियेत वापरली जाते.

लॉकएसएसला नॅशनल सायन्स फाउंडेशनने तसेच सन मायक्रोसिस्टिमने मान्यता दिली आहे. अमेरिकेतील ८० ग्रंथालयांनी त्याचा वापर प्रायोगिक तत्त्वावर सुरू केला आहे. त्यात अर्थात समस्या उद्भवणारच. त्याशिवाय हा प्रकल्प तसा खूप खर्चिकही आहे. तांत्रिक समस्यांप्रमाणेच आर्थिक अडचणीही विचारात घ्याव्या लागतील. पुस्तक प्रकाशक व नियतकालिकांचे मालक आपल्या प्रकाशनातील मजकूर सर्वत्र सहजी उपलब्ध झाला तर आपला खप व उत्पन्न यावर प्रतिकूल परिणाम होईल म्हणून या योजनेबाबत साशंक आहेत. त्यातूनही मार्ग काढावा

लागेल. परंतु जगातील विशिष्ट ज्ञान हे एकाच कुठल्यातरी ग्रंथालयात बंदिस्त राहू नये, नालंदा-तक्षशिला-अलेक्झांड्रिया यांची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये म्हणून, ग्रंथांच्या संगणकीय उपलब्धतेच्या कक्षांची जागतिक व्याप्ती वाढवावी ही कल्पना महत्त्वाची आहे हे निश्चितच! लॉकएसएस या कल्पनेचा भारतीय ग्रंथालयांनीही वापर करावा असे सुचवावेसे वाटते. आपल्या अनेक ग्रंथालयांमध्ये दुर्मिळ ग्रंथ आहेत; पण अभ्यासकांनाही ते उपलब्ध करून दिले जात नाहीत. त्यांच्या झेरॉक्स प्रती देण्याबाबतही टंगळमंगळ केली जाते. खरे तर अशा दुर्मिळ ग्रंथांचा अभ्यास करणारे कोणी भेटले तर त्याला या ग्रंथालयांची सर्वातोपरी मदत करायला हवी. लॉकएसएस सारख्या उपक्रमांद्वारे सर्वत्र सव ग्रंथ उपलब्ध व्हावेत ह्या कल्पनेला चालना मिळेल. अभ्यासकांनाही त्यामुळे आपला वेळ सत्कारणी लावता येईल.



## वाचकांना आवाहन....

मेहता मराठी ग्रंथ जगतच्या मागील वर्षीच्या दिवाळी अंकाचे आपण भरभरून स्वागत केले. कौतुकाची, अभिनंदनाची अनेक पत्रे आली. वाचकांचे हे प्रोत्साहन आम्हाला लाखमोलाचे वाटते. यावर्षी एक वेगळा विषय घेऊन आपल्या भेटीला येत आहोत. वाचकांनीही त्यात सहभागी करून घेण्याचे आम्ही ठरवले आहे.

यावर्षीच्या दिवाळी अंकात वेगवेगळ्या प्रसंगातील गमती-जमतींचा खजाना वाचकांसाठी खुला होणार आहे.

आपल्या रोजच्या धावपळीत, काही निवांतक्षणी आपल्या आयुष्यात अनेक गमती-जमती घडत असतात. खाली दिलेल्या विषयांमधील आपल्या आयुष्यात घडलेल्या गमती, धम्माल, मज्जा लिहून पाठवा. वाचनीय ठरणाऱ्या गमती दिवाळी अंकात दिल्या जातील.

**१. खरेदीतील गमतीजमती**
**२. पाककलेतील गमतीजमती**
**३. नोकरी व्यवसायातील गमतीजमती**
**४. बॉसच्या गमतीजमती**
**५. मुलांच्या गमतीजमती**
**६. शाळा-कॉलेजातील गमतीजमती**
**७. लग्न समारंभातील गमतीजमती**
**८. सासुरवाडीच्या गमतीजमती**



# साहित्यवार्ता

### ❒ हिलरी क्लिंटनच्या पुस्तकाने दहा लाखांचा टप्पा ओलांडला.

बिल क्लिंटन यांच्या पत्नी आणि न्यूयॉर्कच्या सिनेटर हिलरी क्लिंटन यांनी लिहिलेल्या 'लिव्हिंग हिस्टरी' या पुस्तकाने हॅरी पॉटरपाठोपाठ घोडदौड चालविली असून एका महिन्यातच दहा लाखांचा टप्पा ओलांडला आहे.

लिव्हिंग हिस्टरी या पुस्तकात हिलरी यांनी आपल्या आत्मकथनाबरोबरच अध्यक्ष क्लिंटन आणि मोनिका लेविन्स्की यांच्या कथित संबंधांची कहाणीही आपल्या दृष्टिकोनातून लिहिली आहे.

पुस्तकाच्या झंझावाती खपामुळे आनंदित झालेले सायमन अँड श्यूस्टर प्रकाशनगृहाचे प्रतिनिधी सांगतात की, हे पुस्तक खपेल याची आम्हाला खात्री होतीच. पण ते इतक्या वेगाने जगभरातील वाचक डोक्यावर घेतील, अशी अपेक्षा नव्हती. प्रकाशकांनी पहिलीच आवृत्ती दहा लाखांची छापण्याचे ठरविले, तेव्हा अनेकांनी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. राजकीय आत्मचरित्रांचा आणि चरित्रांचा वाचकवर्ग नेहेमीच मर्यादित असतो, हे आजवरचे गणित या पुस्तकाने कोलमडून पडले आहे. हिलरी क्लिंटन या पुस्तकामुळे गलेलठ्ठ मानधन मिळणाऱ्या लेखकाच्या वर्गात जाऊन बसल्या असून त्यांना प्रकाशकांनी ८० लाख डॉलर मानधन दिले होते.

बिल क्लिंटन यांच्याशी संबंध असल्याचा आरोप असणाऱ्या मोनिका लेविन्स्की यांनीही याआधी पुस्तक लिहिले होते. तेही तडाखेबंद खपले. पण त्या पुस्तकाच्या लोकप्रियतेवर हिलरी यांनी वरताण केली आहे. सीएनएन या वाहिनीवरील क्रॉसफायर हा चर्चेचा लोकप्रिय कार्यक्रम चालविणारे टकर कार्लसन यांनी हे पुस्तक मुळीच खपणार नाही, असा अंदाज केला होता. पण त्यांना त्यांचे शब्द आता गिळावे लागले आहेत. केवळ अमेरिकेतच नव्हे तर युरोपसहित जगभर हिलरींच्या पुस्तकाने झंझावात निर्माण केला असून खरेदी केलेल्या प्रत्येक प्रतीवर लेखिका सही करेल अशी योजना प्रकाशकांनी ठिकठिकाणी राबविली. लंडनमध्ये त्यासाठी हिलरी आल्या असता सह्या करून त्यांचा हात दुखून आला. काही तासांत त्यांना हजारो सह्या कराव्या लागल्या! दहा लाख प्रतींची विक्री झाल्यानंतर आता प्रकाशक दुसरी आवृत्ती किती प्रतींची काढतात, याकडे ग्रंथविश्वाचे लक्ष लागले आहे.

या इंग्रजी पुस्तकाचा मराठी भाषेमधिल अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे लवकरच प्रकाशित होईल.

### ❒ तरुण गायकांच्या कंठातून संत ज्ञानेश्वरांच्या अभंगांची ध्वनिचित्रफित

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे काही अभंग आणि विराण्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकरांच्या आवाजात घराघरात यापूर्वीच पोहोचल्या आहेत. आता नव्या पिढीतील तरुण गायकांच्या आवाजात ज्येष्ठ

संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर ज्ञानेश्वरमाऊलींचेच इतर अभंग स्वरबद्ध करत आहेत.

संत ज्ञानेश्वरांच्या रचनांवर आधारित सारेगामा एचएमव्ही कंपनीतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या लता मंगेशकरांच्या 'ज्ञानेश्वर माऊली' या पहिल्या ध्वनीचित्रफितीचे (व्हीसीडी) प्रकाशन लतादीदींच्याच हस्ते करण्यात आले. त्यानिमित्ताने बोलताना पं. हृदयनाथ मंगेशकर म्हणाले की, तरुण पिढीतील बेला शेंडे, सावनी शेंडे आणि प्राजक्ता जोशी या अतिशय सुरेल आवाजात गाणाऱ्या गायिकांना घेऊनच ज्ञानेश्वरीमधील आतापर्यंत स्वरबद्ध न केलेले १२ अभंग स्वरबद्ध करण्यात येत आहेत. ज्ञानेश्वरीमधील एका संपूर्ण अध्यायाची स्वररचना पूर्ण केली आहे. असे पं. हृदयनाथांनी सांगितले.

लतादीदींच्या आवाजात त्यांनी १९६७ मध्ये 'ज्ञानेश्वरी ॲण्ड महाभारत' या नावाची लाँगप्ले रेकॉर्ड एचएमव्ही तर्फे बाजारात आणली होती. 'ओम नमोजी आद्या', 'घनू वाजे घुणघुणा', 'पैल तो गे काऊ कोकताहे' आणि 'मोगरा फुलला' हे चार अभंग, तसेच 'आता विश्वात्मके देवे' इत्यादींचा समावेश त्यामध्ये होता. त्यामधील पसायदान तर दीदींच्यात आवाजात शाळांमधील प्रार्थना म्हणून रुढ झाले. विशेष अमराठी रसिक डोळ्यापुढे ठेवून या अभंगांना झूल वेलानी यांच्या आवाजातील रसाळ निरुपणही या रेकॉर्डमध्ये होते.

'ज्ञानेश्वर माऊली' या एचएमव्हीच्या पहिल्या ध्वनीचित्रफितीमध्ये संत साहित्याचे अभ्यासक डॉ. राम शेवाळकरांच्या ओघवत्या शैलीत प्रत्येक गीतातील भावार्थ उलगडून सांगितला आहे. तर प्रत्येक गीताला स्वरसाज देताना त्यामागे कल्पना कशा सुचल्या याचा मागोवाही पं. हृदयनाथ मंगेशकरांनी या व्हीसीडीमध्ये घेतला आहे. पाच वर्षांपूर्वी हे चित्रण अरुण काकतकर आणि राजीव पार्सेकर यांनी केले होते.

मराठीतील आद्यकवी असणाऱ्या ज्ञानेश्वरांची माहिती आजच्या पिढीला नाही. म्हणूनच आता हे निरुपण मराठीत करावे लागत आहे, असे पं. हृदयनाथ मंगेशकरांनी गंमतीने सांगितले. माऊलींचे श्रीक्षेत्र आळंदी येथील दीदींनी केलेल्या पूजेचे नेत्रसुखद चित्रण; तसेच आसपासचा रम्य आणि पवित्र परिसर यामुळे ही व्हीसीडी अत्यंत देखणी झाली आहे

## ❒ विभावरी पाटील पुरस्कार

मराठी साहित्यसृष्टीमध्ये स्वत:ची नाममुद्रा ठळकपणे उमटविणारे भारत सासणे यांना यंदाचा 'विभावरी पाटील साहित्य पुरस्कार' मिळाला आहे. हा पुरस्कार अनुष्टुभ प्रतिष्ठानतर्फे देण्यात येतो. योगायोग असा की श्री. सासणे यांनी आपल्या लेखनकारकीर्दीची सुरुवात 'अनुष्टुभ' मधूनच केली. त्यावेळी त्यांनी लिहिलेल्या 'एका पैशाची गोष्ट', 'बाबींचं दु:ख', 'स्वच्छ झिरपता प्रकाश' या गोष्टींमुळे सासणे यांचं लेखन बहरतच गेलं. वेगळी शैली, चाकोरीबाहेरच्या विषयांची सहजपणे केलेली समर्थ हाताळणी, दमदार व्यक्तिचित्रण, प्रवाही, अर्थवाही भाषा यासारख्या वैशिष्ट्यांमुळे अल्पावधीतच सासणे यांच्या नावाभोवती एक वलय निर्माण झालं. मराठी नवकथेचा बहर ओसरल्यानंतर समर्थ कथा अभावानेच लिहिली जात होती. त्या पार्श्वभूमीवर सासणे यांची कथा आपल्या सामर्थ्याने रसिकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. सासणे यांच्या लेखनामध्ये अनेकदा स्त्री ही केंद्रस्थानी असते. स्त्रीमधील आदिमशक्तीचा शोध घेण्याचाही प्रयत्न सासणे करतात. स्त्रीचं मन जाणून घेणं, तिचं दु:ख जाणणं, तिला एक जिताजागता माणूस म्हणून समजून घेणं ही सासणे यांच्या लेखनातील आणखीही काही



वैशिष्ट्ये आहेत. सासणे यांची बालवाङ्मयाची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. प्रतिभावान, उत्तम कल्पनाशक्तीचं वरदान असलेल्या लेखकानं बालवाङ्मयामध्ये खूप काही करण्यासारखं आहे, असं मानणाऱ्या सासणे यांना, मराठी कथेसाठी आता सशक्त व्यासपीठ उरलेलं नाही, याची खंत आहे. सासणे यांना ज्या 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' या कादंबरीबद्दल हा सन्मान मिळाला आहे, त्या कादंबरीतली काव्यात्मता अनेकांना भावली. या कादंबरीत त्यांनी मांडणीच्या दृष्टीने अन्यही प्रयोग केले आहेत. काव्य आणि नाट्य यांची इतकी एकजीवता क्वचितच अनुभवास येते. या पुरस्कारामुळष सासणे यांच्या आगामी कादंबरीलेखनाबद्दल कुतूहल आणि अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

## ❒ 'संतांकडून लोकभाषेच्या वापरानंतर भाषेचा संघर्ष उभा'

''संत काही सांगू लागतात, त्यावेळी भाषेचा संघर्ष झालेला दिसतो. धर्माचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी संतांनी लोकभाषेचा वापर केला आणि भाषेचा संघर्ष उभा राहिला असे घडले आहे,'' असे ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी सांगितले.

विद्यानंद प्रकाशनातर्फे डॉ. मो. गो. धडफळे यांच्या 'पालिभाषेतील बौद्ध संत साहित्य' या पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे वृत्तसंपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते ८ जुलै रोजी झाले.

धर्माला धर्मनिरपेक्ष करण्याचे काम संत करतात, असे मत मांडून प्रा. जाधव म्हणाले, ''धर्माचे आचरण प्रत्यक्ष कसे करायचे याचा वस्तुपाठ संत देतात. मदर तेरेसा, गाडगेमहाराज यांचे कार्य आपल्यासमोर आहे. स्थिर धर्माला गतिशील करण्याचे काम संतमंडळी करीत असतात. ज्या धर्मात संतपरंपरा नाही, त्या धर्मात उणीव असते. खरा धर्म संतसाहित्यातच सापडतो. त्यामुळे समकालीन संतसाहित्याचा भारतीय पातळीवर तौलनिक अभ्यास व्हायला हवा.''

श्री. पाध्ये म्हणाले, ''बौद्धाने स्त्रियांना जाहीरपणे समान स्थान नाकारले असले, तरी तिच्या विचारांना अधिष्ठान दिले आणि स्त्रियांनी केलेल्या रचनांना प्रतिष्ठीतही केले. बौद्धाने सांगितलेल्या अहिंसा तत्त्वाचा पुढे राजकारण, राष्ट्रकारण, समाजकारण यात किती व कसा उपयोग केला गेला याचाही धांडोळा घ्यायला हवा.''

डॉ. धडफळे म्हणाले, ''मराठी वैष्णव वारकरी संतसाहित्यात साम्यस्थळे अनेक आहेत. बौद्ध पाली संतसाहित्य व रामदासी-वारकरी संत साहित्य यांचा तौलनिक अभ्यास फलदायी ठरेल.''

## ❒ माहितीचा अधिकार नाकारण्यासाठी आहे काय?

''माहितीचा अधिकार हा माहिती देण्यासाठी असून तो माहिती नाकारण्यासाठी केला आहे का? अशी शंका त्यातील तरतुदी पाहून वाटते,'' असे माजी केंद्रीय गृहसचिव डॉ. माधव गोडबोले म्हणाले.

नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडी या संस्थेने तयार केलेल्या 'सोशल वॉच इंडिया-२००३' अहवालाचे प्रकाशन 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. गोडबोले म्हणाले, 'देशात वेगवेगळ्या कारणांसाठी समित्या स्थापन केल्या जातात. मात्र त्यांचे अहवाल प्रकाशित होत नाहीत किंवा ते प्रकाशित झाले, तरी त्यांची अंमलबजावणी होत नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी यात बदल होत नाही.''

प्रा. कोठारी म्हणाले, ''सध्या लोकशाहीचे व राजकारणांचे व्यापारीकरण, गुन्हेगारीकरण होत

आहे. लोकांना मूलभूत हक्कासाठी झगडावे लागत आहे. ही परिस्थिती पाहून लोकशाहीवरील विश्वास कमी होत आहे. मात्र गोरगरीबच लोकशाही वाचवू शकतील, असा विश्वासही वाटतो.''

शिक्षण व आरोग्यासारखी मूलभूत सुविधा देण्यापासून राज्य सरकार दूर जात आहे, असे नमूद करून प्रा. सत्यरंजन साठे म्हणाले, ''गरिबांना शिक्षण व आरोग्याच्या सुविधा देणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मात्र, याविरुद्ध कोणत्याही विद्यार्थी, पालकाच्या संघटनेने आवाज उठवला नाही. या मूलभूत हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्यास मुभा आहे. तथापि, तेथे जाणे सामान्यांना परवडणारे नाही.''

''हिंदू धर्मातील नव्वद टक्के मध्यमवर्गीय हिंदुत्ववादाकडे झुकले आहेत. त्यामुळे शिक्षणाचे भगवेकरण होत असताना त्याविरुद्ध आवाज उठवला जात नाही. वैद्यकीय व अभियांत्रिकीची भरमसाट शुल्कवाढ होत असतानाही, कोणत्याही डॉक्टर व अभियंत्यांच्या संघटनेने विरोध केला नाही. हे मध्यमवर्गीय 'फॅसिस्ट' होत असल्याचे लक्षण आहे.'' असे श्री. केतकर यांनी सांगितले.

### ❒ आगामी साहित्य संमेलन औरंगाबादला होणार

आगामी ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन देवगिरी महाविद्यालयात भरविण्यात येणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ६ जुलैच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

महामंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांची मराठवाडा साहित्य परिषदेत बैठक झाली. या वेळी १९ पैकी १६ सदस्य उपस्थित होते. त्यावेळी मराठवाडा साहित्य परिषद व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे देवगिरी महाविद्यालय यांनी संयुक्तपणे दिलेले आमंत्रण स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला.

डिसेंबरच्या शेवटच्या किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात हे संमेलन घेण्यात येईल.

संमेलन अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम महामंडळ कार्यालयाकडून जाहीर करण्यात येईल. ता. २० ऑक्टोबर २००३ किंवा त्याआधी अध्यक्षांची निवड जाहीर करण्यात येईल.

### ❒ भक्तिकोशाच्या चौथ्या खंडाचे प्रकाशन

आदित्य प्रतिष्ठानने तयार केलेल्या भक्तिकोशाच्या चौथ्या खंडाचे, 'भारतीय उपासना' ग्रंथाचे पेट्रोलियम राज्यमंत्री सुमित्रा महाजन यांच्या हस्ते ८ जुलै रोजी प्रकाशन झाले. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे.

'कालनिर्णय' चे संस्थापक जयंत साळगावकर या वेळी उपस्थित होते. डोंबिवलीचे विनायकराव गोडबोले व वंदना गोडबोले यांना यावेळी श्री. साळगावकर यांच्या हस्ते 'श्रद्धाश्री' पुरस्कार देण्यात आला.

श्रीमती महाजन म्हणाल्या, ''आज प्रत्येक क्षेत्रात संस्कारांची शुद्ध बीजे रोवली गेली पाहिजेत. यामध्ये आम्हा राजकारण्यांनीही मोठा वाटा उचलायला हवा. तरूण पिढीवर हे संस्कार घडवण्याचे काम आदित्य प्रतिष्ठानसारख्या संस्थेच्या माध्यमातून आणि त्यांनी निर्माण केलेल्या ग्रंथांतून होत आहे. हे ज्ञान संगणकासारख्या माध्यमातही साठवले गेले पाहिजे. आजच्या पिढीला पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे या कोशातून मिळू शकतील.''

''पहिल्या भागात हिंदू धर्म, दुसऱ्या भागात हिंदू धर्मातील सदाचार आणि तिसऱ्या भागात हिंदू धर्माची वैशिष्ट्ये अशी या कोशाची विभागणी करण्यात आली आहे. उपासनेची विविध अंगेंही यात विशद करण्यात आली आहेत.'' असे श्री. अभ्यंकर यांनी सांगितले.

प्रतिष्ठानतर्फे अखिल भारतीय संत विद्यापीठ उभारण्यात येणार असून, त्याचे पहिल्या टप्प्यातील काम सुरू झाले आहे, असे नमूद करून श्रीमती अभ्यंकर म्हणाल्या, ''कर्वेनगर येथे दहा हजार चौरस फूट जागेत हा प्रकल्प साकारणार आहे. तसेच प्रतिष्ठानतर्फे भक्तिकोशाचा पाचवा खंड 'तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे' सहा महिन्यांत प्रकाशित होईल.''

आदित्य प्रतिष्ठानच्या प्रकल्पासाठी पुणे-मुंबई महामार्गावर जागा उपलब्ध होण्यासाठी श्रीमती महाजन यांनी प्रयत्न करावेत, असे श्रीमती अभ्यंकर यांनी आपल्या भाषणात अप्रत्यक्षपणे सुचवले. त्यावर आपल्या भाषणात श्रीमती महाजन म्हणाल्या, ''त्यासाठी राज्यात तुम्हाला सुईच्या टोकावर मावेल इतकीही जमीन मिळण्याची शक्यता नाही.'' याचाच संदर्भ देत श्री. साळगावकर म्हणाले, ''सध्या अटलबिहारी वाजपेयी या धर्मराजाचेच देशात राज्य आहे. अटलजी हे सुमित्राताईंना बहीण मानतात. त्यामुळे या जागेसाठी त्यांनीच काहीतरी करावे.''

### ❒ नारायण सुर्वे यांच्यावरील उद्‌बोधक माहितीपट

रात्रीची वेळ..., मुंबईतल्या गिरणीच्या बंद दरवाज्यासमोरचा निर्मनुष्य रस्ता... आणि तिथेच आईविना रडणारे एक अर्भक. गंगाराम सुर्वे नावाच्या सर्वसामान्य गिरणी कामगाराने या अर्भकाला जवळ केले. त्याला नाव दिले नारायण. 'नारायण गंगाराम सुर्वे' या माहितीपटातील हे दृश्य आहे.

***''कामगार आहे मी तळपती तलवार आहे***
***सारस्वतांनो थोडासा गुन्हा घडणार आहे.''***

या शब्दात पांढरपेश्यांना ठणकावणाऱ्या नारायण सुर्वे यांच्या आयुष्याची ही खडतर सुरुवात.

कामगार नेते नारायण गंगाराम सुर्वे यांचा जीवनपट अरुण खोपकर दिग्दर्शित व खयाल ट्रस्ट निर्मित माहितीपटात उलगडून दाखवण्यात आला आहे. पुणे महानगरपालिका कामगार युनियनतर्फे कामगारांसाठी आयोजित कार्यक्रमात या माहितपटाचे सार्वजनिक प्रदर्शन करण्यात आले. स्वत: नारायण सुर्वे या वेळी उपस्थित राहणार होते; परंतु हृदयविकाराचा त्रास झाल्याने ते अनुपस्थित राहिले, असे युनियनच्या चिटणीस मुक्ता मनोहर यांनी सांगितले.

कम्युनिस्ट चळवळीने प्रेरित झालेल्या सुर्वे यांनी शाळा शिपाई, पोस्टमन अशा नोकऱ्या करीत आपले शिक्षण पूर्ण केले. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख यांच्या गीतांनी ते भारावून गेले. त्यानंतर त्यांची पहिली कविता जन्माला आली.

***डोंगरी शेत माझं, मी बेणू किती***
***आल वरीस राबुन मी मरू किती***

कवितांच्या माध्यमातून सुर्वे यांनी भांडवलशाहीला प्रखर विरोध केला. माणूस हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या कविता समाजापुढे आल्या. शब्द लिहिणे सोपे असते; पण शब्दासाठी जगणे अवघड हे वास्तव जाणलेल्या सुर्वे यांनी म्हटले -

***झूठ बोलून आयुष्य कुणालाही सजवता येते***
***अशी आमंत्रणे आम्हालाही आली, नाही असेच नाही.***

या माहितपटाचे पटकथा, संवाद लेखन शांता गोखले यांचे आहे. प्रसिद्ध अभिनेते किशोर कदम यांनी या माहितीपटात नारायण सुर्वे यांची भूमिका केली आहे. नारायण सुर्वे व त्यांच्या

पत्नी कृष्णाबाई यांनीही या माहितीपटात आपले मनोगत व्यक्त केले आहे. चाळीस मिनिटाचा हा माहितीपट नेटके संवादलेखन व वास्तववादी चित्रणामुळे अत्यंत रंजक झाला आहे.

मार्क्सवाद्यांनी सांस्कृतिक गुणांकडे दुर्लक्ष केले. संतसाहित्य, आधुनिक साहित्याचा वारसा, महाराष्ट्रातील बदलत्या जाणिवा या मुद्यांना डाव्या चळवळीला स्पर्श करता आला नाही, याची खंत सुर्वे यांनी या माहितीपटात बोलून दाखविली आहे. कामगार, डाव्या चळवळीतले कार्यकर्ते याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीनेही 'नारायण गंगाराम सुर्वे' हा माहितीपट उद्बोधक असा आहे.

### ❐ शंकराचार्यांच्या जीवनावरील नाटक : काया परकाया

'काया परकाया' सारख्या वेगळ्या विषयावरील नाटक लिहिताना रंगनाथ तिवारी यांनी नाट्यवस्तूला पूर्ण न्याय दिलाय, असे प्रतिपादन संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. वि. रा. करंदीकर यांनी १२ जुलै रोजी पुणे येथे केले.

आद्य शंकराचार्यांच्या परकायाप्रवेशावर आधारलेल्या तिवारी यांच्या 'काया परकाया' या नाटकाच्या विमोचनानंतर ते म्हणाले, ''आद्य शंकराचार्य व सॉक्रेटिस यांची तुलना करायचीच झाली, तर सॉक्रेटिस हा सतत प्रश्न विचारून इतरांना गोंधळात टाकत असे. शंकराचार्यांनी मात्र असे कधीच केले नाही. तिवारींच्या या नाटकातील काही वाक्ये इतकी विलक्षण आहेत, की त्यामुळे मी मोहून गेलो. नाटक हा माझा प्रांत नाही, अशी कबुली देत ते म्हणाले, की या नाटकाचा विषय मात्र माझ्या अभ्यासकक्षेत येतो. त्यामुळेच ते आत्मसाक्षात्कारापर्यंत जाऊन पोहोचलेले होते, हे मी सांगू शकतो, असेही ते म्हणाले.

अभिनेते माधव वझे म्हणाले, नभोनाट्याच्या पातळीवर जाणाऱ्या या नाटकात रहस्याबाबत प्रेक्षकांना विश्वासात घेऊन पात्रांना अंधारात ठेवण्याचे तंत्र अवलंबले आहे. या नाटकावरून आपल्याला 'हयवदन' या कृतीची आठवण होऊ शकेल. अमूर्ताकडून मूर्ताकडे व परत अमूर्ताकडे असा हा एकंदर प्रवास असला, तरी मूळ प्रश्नांचे लेखकाचे भान सुटलेले नाही, हे महत्त्वाचे, असे ही ते म्हणाले.

### ❐ 'शारीरिक स्वास्थ्यासाठी मन आनंदी ठेवा'

''खूप हसा. मन आनंदी ठेवा आणि निरोगी राहा. शारीरिक स्वास्थ्यासाठी मन नेहमीच प्रफुल्लित असणे आवश्यक आहे,'' असे ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी सांगितले.

स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे बनी डिसोझा यांच्या 'टंग इन चीक' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. सरदेसाई म्हणाले, ''शारीरिक स्वास्थ्य हे मनाशी निगडित असते. तसेच मनाला सतत बदल हवे असतात. आपल्या आसपासच्या गोष्टी थोड्या जरी बदलल्या तरी एकदम वेगळे व नवे वाटू लागते. अप्राप्य ते प्राप्य करू पाहण्याची मनाची आस असते. पण एखादी गोष्ट मिळाली नाही, की ते दु:खी होते. अशा वेळी ती गोष्ट दुसऱ्यालाही मिळू नये, असा प्रयत्न ते करते किंवा स्वत:चाच विनाश घडवू पाहते. अशा परिस्थितीत मनावर नियंत्रण ठेवण्याची गरज असते. विनोद करणे व हसणे हे मन आनंदी ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.''

श्री. ग्रँट म्हणाले, ''बनी डिसोझांचे लेखन हे आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन'सारखे



आहे. सामान्य माणसाच्या मनातील गोष्टीच विनोदी शैलीने ते मांडतात. त्यांच्या कल्पना रंजक व वेगळ्या असतात. मनाला अचंबित करणाऱ्या असतात.''

डॉ. पी. एन. कुंभारे यांचेही यावेळी भाषण झाले. श्री. डिसोझा यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेहवर्धन प्रकाशनाच्या संचालिका डॉ. स्नेहल तावरे यांनी स्वागत केले.

### ❐ दहा वर्षात 'संस्कारधारा नित्यपाठा'च्या दोन लाख प्रतींची विक्री

साताऱ्याच्या कौशिक प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'संस्कारधारा नित्यपाठ' या पुस्तकाच्या गेल्या दहा  वर्षात दोन लाख प्रतींची विक्री झाली. एकोणतिसाव्या आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ गायक पंडित भीमसेन जोशी यांच्या हस्ते ६ जुलै रोजी सातारला झाले.

'संस्कारधारा नित्यपाठ' या पुस्तकाच्या निर्मितीबद्दल कौशिक प्रकाशनचे अरुण गोडबोले म्हणाले की, १९९२ साली डॉ. अच्युत गोडबोले यांच्या मुलाची मुंज होती. नेहमी आपण समारंभात गुलाबाचे फूल सर्वांना देतो. आम्ही या वेळी मुलांच्यावर संस्कार व्हावेत या कल्पनेने 'संस्कारधारा' पुस्तक द्यायचे ठरवले.

प्रात:स्मरण, श्री नारद स्तोत्र, मनाचे श्लोक, सूर्यनमस्कार, संध्येची नावे, गायत्री मंत्र, श्री गणपती अथर्वशीर्ष, आरत्या, मंत्रपुष्पांजली प्रार्थना, शुभंकरोती, रामरक्षा, श्रीभीमरूपी स्तोत्र आणि पसायदान यांचे संकलन केलेले आहे. पहिल्या आवृत्तीपासून या पुस्तकाची किंमत दोन रुपये होती. आता ती सहा रुपये आहे.

पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन पंडित भीमसेन जोशी यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर दहा वर्षात या 'संस्कारधारा नित्यपाठ'च्या अठ्ठावीस आवृत्त्या निघाल्या, दोन लाखांच्यावर विक्री झाली.

### ❐ नव्या जागतिक रचनेसाठी अमेरिकेला भारताची गरज

''आंतरराष्ट्रीय वर्चस्व कायम ठेवण्यासाठी आखल्या जात असलेल्या नवीन धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अमेरिकेला भारताच्या सहकार्याची गरज आहे. आपल्यासाठी ही 'ऐतिहासिक संधी' असून, त्याबाबत सहकारी पातळीवर गंभीरपणे विचार व्हायला हवा.'' असे मत 'ॲकॅडमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन'चे अध्यक्ष डॉ. पै पाणंदीकर यांनी व्यक्त केले.

''आपल्या वर्चस्वाला पूरक वातावरणासाठी आंतरराष्ट्रीय व विशेषत: पश्चिम आशियाची फेररचना करण्यावर अमेरिकेचा भर आहे. जिहादचा पुरस्कार करणाऱ्या दहशतवाद्यांच्या व त्यांना आश्रय देणाऱ्या सौदी अरेबिया व पाकिस्तान यांसारख्या देशांच्या विरोधात अमेरिकेची पावले पडत आहेत.'' असे त्यांनी नमूद केले.

''सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज (सीएएसएस) व मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँड ॲग्रिकल्चरने आयोजिलेल्या कार्यक्रमात ''इंडो-अमेरिकन रिलेशन्स : चेंजिंग पर्स्पेक्टिव्हज' या विषयावर ते बोलत होते. उद्योगपती अभय फिरोदिया, रवी पंडित, तसेच एअर मार्शल (निवृत्त) सदानंद कुलकर्णी, डी. के. अभ्यंकर आदी उपस्थित होते.

श्री. पै पाणंदीकर म्हणाले, ''आपला वरचष्मा कायम ठेवण्यासाठी अमेरिकेकडून होत असलेल्या प्रयत्नात भारताला मोलाची भूमिका बजावयाची आहे. त्यात अमेरिकेचे हितसंबंध जोपासले जाणार आहेत; मात्र त्याचबरोबर आपला आर्थिक विकास साध्य होणार आहे. दारिद्र्य व वाढत्या बेरोजगारीने आपल्यासमोर अंतर्गत सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. तो

सोडविण्यासाठी अमेरिकेची मदत होणार आहे. बाह्य सुरक्षेसाठीही ही मदत उपयोगी ठरणार आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील कामगिरीमुळे भारतीयांकडे पाहण्याचा अमेरिकेचा दृष्टिकोन बदलत आहे. त्यामुळे व सामरिक कारणामुळे एक 'ऐतिहासिक संधी' उपलब्ध झाली आहे. भारताने साथ दिली नाही, तरी अमेरिका आपले धोरण राबविणारच आहे. अमेरिकेच्या सर्व अटी आपण मान्य कराव्यात असे नाही; पण किमान या संधीच्या लाभ-हानीचा व बदलत्या जागतिक संदर्भाचा गंभीरपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

अकरा सप्टेंबरची घटना पुन्हा घडू नये म्हणून अमेरिका अतिशय दक्ष असल्याचे नमूद करून ते म्हणाले, ''जिहादी व जनसंहारक अस्त्रांपासून आपल्याला धोका असल्याची जाणीव अमेरिकेला आहे. इराक युद्ध ही सुरुवात आहे. ही साखळी सीरिया, इराण, पाकिस्तान, सौदी अरेबिया आदी देशांपर्यंत जाणार आहे. अमेरिकेसाठी पाकिस्तानची उपयुक्तता संपत आहे. कारण तेथे जिहादींचे प्राबल्य वाढत आहे; वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान येथे जिहादींचे वर्चस्व असलेली सरकारे आहेत, म्हणूनच अमेरिकेत भारताच्या बाजूने मोठा मतप्रवाह आहे.''

''या सर्वांची दखल घेत 'नेहरूकालीन' मानसिकतेतून बाहेर पडण्याची आज गरज आहे. आपल्या परराष्ट्र धोरणात बदल व्हायला हवा. आपले नेमके हितसंबंध ओळखून व प्रगतीची गरज ओळखून आपण पावले टाकायला हवीत.'' असे श्री. फिरोदिया यांनी नमूद केले.

### ❒ 'पुरुषश्रेष्ठ' कायदे बदलले तरच स्त्रियांचे प्रश्न सुटतील

''पुरुषाला श्रेष्ठ मानून तयार केलेला कायदा बदलला तरच स्त्रियांच्या प्रश्नांबाबबत जागृती घडून येईल.'' असे प्रतिपादन 'आयएलएस' विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या वैजयंती जोशी यांनी केले.

पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या ३९ व्या वर्धापनानिमित्त आयोजिलेल्या 'महिला जागृती' या परिसंवादात त्या बोलत होत्या.

पुरुषप्रधान संस्कृतीला सुरुवातीला धर्माने व आज कायद्याने आधार दिला, असे नमूद करून वैजयंती जोशी म्हणाल्या, ''हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती आदी कोणत्याही कायद्यानुसार पाल्याचे नैसर्गिक पालकत्व वडिलांकडेच दिले जाते. आईला नैसर्गिक पालकत्वाचे अधिकारही मिळत नाहीत. अशाच प्रकारचा दृष्टिकोन रहिवासी दाखला, वारसा हक्क आदी कायद्याबाबत दिसून येतो. स्त्रियांचे प्रश्न चांगल्या पद्धतीने समजावून घेण्यासाठी विधी महाविद्यालयातील शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना न्यायालयात प्रतिनिधित्व करण्याची बार कौन्सिलने परवानगी द्यावी. त्यामुळे 'स्त्री'पणाकडून माणूसपणाकडे स्त्रीची वाटचाल कशी होईल हे समाजाने पाहिले पाहिजे.''

श्री. रॉय म्हणाले, ''महिलांची परिस्थिती बदलण्यासाठी कायद्याच्या प्रक्रियेत संवेदनशीलता निर्माण होणे आवश्यक आहे. पोलिसांनीही कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन संवेदनशीलतेने हे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, तसे प्रयत्नही होत आहेत. पुरुषांबरोबरच महिलांचीही मानसिकता बदलायला हवी.''

मीरा बोरवणकर म्हणाल्या, ''महिलांच्या प्रश्नांबाबत महिला अधिकारी व कर्मचारी जास्त संवेदनशीलतेने काम करताना आढळून येतात. ग्रामीण भागातील महिला या पुरुष अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवायला घाबरतात. त्यामुळे महिला पोलिसांची संख्या वाढवायला हवी. पोलिसांमध्ये 'भगिनीभाव' वाढवून केवळ प्रसिद्धींसाठी या प्रश्नांकडे न बघता त्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करायला हवी.''



### ❒ 'देशातील तरुण पिढीसाठी प्रा. नारळीकर हे रोल मॉडेल'

''ज्येष्ठ शास्त्रज्ञ, ख्यातनाम लेखक, बिनीचे विज्ञानप्रसारक, 'आयुका' संशोधन संस्थेचे शिल्पकार प्रा. जयंत नारळीकर हे केवळ शास्त्रज्ञांसाठीच नव्हे, तर देशातील संपूर्ण तरुण पिढीसाठी 'रोल मॉडेल' आहेत...''

'आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र व खगोलभौतिकी केंद्रा'च्या (आयुका) संचालकपदावरून प्रा. नारळीकर १८ जुलैला निवृत्त झाले. म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. नारळीकर यांचे वडील प्रा. नारळीकर यांचे वडील प्रा. विष्णू नारळीकर यांचे विद्यार्थी असलेले प्रा. पी. सी. वैद्य आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. के. रॉयचौधरी यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

यानिमित्त खगोलशास्त्राशी संबंधित देश-विदेशातील शास्त्रज्ञांचा छोटा मेळावाच भरला होता. या शिवाय 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे' महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर, विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. वि. ग. भिडे, प्रा. गोविंदस्वरूप, 'आयुका'चे नवनियुक्त संचालक प्रा. नरेश दधिच; तसेच पुण्यातील प्रयोगशाळांचे प्रमुख आदी या वेळी आवर्जून उपस्थित होते. शास्त्रज्ञ, ज्येष्ठ सहकारी, मार्गदर्शक, विज्ञान प्रसारक, मित्र या वेगवेगळ्या नात्यातील प्रा. नारळीकर यांचे दर्शन या वेळी घडले. प्रा. नारळीकरांपासून संशोधनाची प्रेरणा घेतल्याचा उल्लेख बहुतेक वक्त्यांनी केला.

प्रा. जयंत नारळीकर हे आदर्श शिक्षक असल्याचे नमूद करून प्रा. वैद्य म्हणाले, ''विद्यार्थ्यांसमोर शिक्षकांचा आदर्श असतो. त्याचबरोबर पुस्तके किंवा टिपणांची वही नसातानाही जो उत्तमरीत्या शिकवतो तो आदर्श शिक्षक. या दोन्ही व्याख्या डॉ. नारळीकर यांना चपलख लागू होतात.'' प्रा. नारळीकर हे विविध क्षेत्रांत यशस्वी झाले आहेत, असे नमूद करून प्रा. रॉयचौधरी म्हणाले, ''शास्त्रज्ञ, लेखक, विज्ञान प्रसारक आदी विविध क्षेत्रांत वावरणारे नारळीकर हे परस्परांपासून भिन्न आहेत की काय, अशी शंका येऊ शकते. या साऱ्यांत यश मिळवून त्यांनी नवीन मापदंडच निर्माण केले आहेत.''

'करिअर'च्या सुरुवातीला आपल्याला 'जयंत नारळीकरांसारखा हो', असा आशीर्वाद मिळाल्याची आठवण डॉ. माशेलकर यांनी सांगितली. ते म्हणाले, ''तीस वर्षांपूर्वीही नारळीकरांबद्दल ही आदरभावना होती. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच मी वाटचाल करीत आहे. शास्त्रज्ञ म्हणून वावरतानाही त्यांनी मूल्यांची सतत जोपासना केली. तत्त्वासाठी आवाज उठविण्याचे धाडस त्यांच्यात आहे. फलज्योतिषाला विद्यापीठीय शिक्षणात स्थान देण्याचा मुद्दा चर्चेत असताना त्याला जाहीरपणे नकार दर्शविण्याचे धाडस त्यांनी दाखविले होते. त्यामुळे त्यांचे कार्य आम्हा सर्वांसाठीच 'दीपस्तंभा'सारखे आहे. विविध क्षेत्रांतील कार्यामुळे ते लोकांचे शास्त्रज्ञ बनले आहेत.''

डॉ. निगवेकर म्हणाले, ''प्रा. नारळीकर हे उत्तम विज्ञानप्रसारक आहेत. त्यांच्या व्याख्यानांतून अनेकांनी प्रेरणा घेतली आहे. त्यांचे प्रशासनही चोख असते. नकार देण्याचे सामर्थ्यही त्यांच्यात आहे.'' आर. पी. बांभ, डॉ. लिंडेन बेल, आर. ठाकूर, राजाराम नित्यानंद, व्ही. चेल्लथुराई, एस. के. पांडे, टी. पी. सिंह, के. सी. नायर, सी. व्ही. विश्वेश्वरय्या, रसेल कॅनन, एस. फिलीप, संजीव धुरंधर, एन. मुकुंद आणि प्रा. नरेश दधिच यांनी या वेळी विचार व्यक्त केले. प्रा. अजित केंभावी यांनी सूत्रसंचालन केले.

''प्रत्येक टप्प्यावर मला चांगली माणसे भेटत गेली आणि त्यामुळे मला काम करणे सुलभ झाले.'' अशा शब्दांत प्रा. नारळीकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, ''सहकाऱ्यांच्या

मदतीमुळेच मला एका वेळी अनेक कामे करता आली. 'आयुका'च्या यशात सर्व सहकाऱ्यांचा वाटा आहे. 'आयुका' मध्ये संशोधनाच्या उत्तम सुविधा आहेत; पण विद्यापीठांकडून त्यांचा वापर पुरेसा होत नाही. विद्यापीठांच्या प्रशासनाच्या भूमिकेत बदल झाला तर आणखी शिक्षक-संशोधक येथे येऊ शकतील.''

### ❐ व्हिडिओ कॅसेट्सच्या किमती घटल्याने निर्माते अस्वस्थ

केबल पायरसी, तसेच व्हिडिओ पायरसीची समस्या अजूनही कायम असताना नवीन, तसेच जुन्या चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेट्स आता अवघ्या ८८ रुपयांमध्ये ग्राहकांना मिळणार आहेत. दरम्यान, व्हिडिओ कॅसेट्सचे दर कमी करण्याच्या निर्णयाचे चित्रपटनिर्माते आणि वितरकांनी थंडे स्वागत केले आहे.

व्हिडिओ कॅसेट्सच्या निर्मितीमध्ये अग्रेसर असलेल्या शेमरू कंपनीतर्फे एवढ्या कमी किमतीत कॅसेट्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गेल्या महिन्यात प्रदर्शित झालेल्या 'हासिल' चित्रपटाचीही व्हिडिओ कॅसेट अवघ्या ८८ रुपयांमध्ये ग्राहकांना मिळणार आहे. व्हिडिओ कॅसेटच्या किमती कमी करण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन करताना 'शेमरू'चे हिरेश गडा म्हणाले, ''मल्टिप्लेक्सची संख्या वाढली असली, तरी येथील तिकिटांचे दर सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत, त्यामुळे आम्ही अत्यंत कमी दरामध्ये नवीन, तसेच जुन्या चित्रपटांच्या कॅसेट्स बाजारात उपलब्ध केल्या आहेत. या कॅसेट्सचा दर्जा चांगला असल्याने ग्राहक त्याचा पुन:पुन्हा आनंद घेऊ शकतील.''

'मुगले आझम', 'पाकिजा', 'आवारा' या गाजलेल्या जुन्या चित्रपटांसह 'ताल', 'हम दिल दे चुके सनम' या चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेट्सच्या किमती मात्र १४८ रुपये ठेवल्या आहेत. व्हिडिओ कॅसेट्सच्या किमती कमी झाल्यामुळे निर्माते-वितरकांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. नवीन चित्रपटाची कॅसेट अवघ्या ८८ रुपयांमध्ये उपलब्ध झाल्याने प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये कसे येणार, असा प्रश्न निर्मात्यांना पडला आहे. जुन्या गाजलेल्या चित्रपटांच्या 'प्रिंट्स'ना अजूनही मागणी असते. जुने चित्रपटही कमी किमतीत उपलब्ध झाल्याने गाजलेल्या चित्रपटांच्या व्यवसायावरही परिणाम होईल. नवीन चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच ते केबल, तसेच व्हिडिओ कॅसेट्सवर उपलब्ध होत असल्याने चित्रपटांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याचे मत निर्माते व्यक्त करतात. याबाबत कारवाई होण्याऐवजी कॅसेट्सचे दर कमी केल्याने चित्रपटसृष्टीला आणखी एक मोठा धक्का बसल्याचीही माहिती एका वितरकाने दिली.

### ❐ नीळकंठ आणि जयश्री खाडिलकर न्यायालयाच्या अवमानबद्दल दोषी

मुंबईतील जातीय दंगलींची चौकशी करणाऱ्या न्या. श्रीकृष्ण यांच्यावर टीका करणारे अग्रलेख दै. 'नवाकाळ'मध्ये लिहिल्याबद्दल तत्कालीन संपादक नीळकंठ खाडिलकर व त्यांची कन्या श्रीमती जयश्री खाडिलकर-पांडे यांना न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी धरण्यात आले आहे.

सध्या आजारी असलेल्या श्री. खाडिलकर यांची अवस्था ध्यानात घेऊन त्यांना केवळ दोन हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. तर श्रीमती खाडिलकर यांना सात दिवसांची साधी कैद व दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा देण्यात आली. न्यायालयाच्या अवमानाचे हे प्रकरण



अत्यंत गंभीर असल्याचे मत खंडपीठाने व्यक्त केले.

चौकशी पूर्ण झाल्यावर न्या. श्रीकृष्ण यांनी अहवाल सादर केला. त्यावर टीका करणारे अग्रलेख दै. 'नवाकाळ' मध्ये आठ, नऊ, अकरा व बारा ऑगस्ट १९९८ रोजी प्रसिद्ध झाले होते. त्यात न्या. श्रीकृष्ण यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली होती. ही टीका म्हणजे न्यायालयावर केलेली चिखलफेक आहे वैयक्तिक टीका करण्यासाठी; तसेच लोकांच्या मनातील न्याययंत्रणेची प्रतिमा डागाळण्यासाठीच ते लेख लिहिण्यात आले होते. हे कृत्य सद्हेतू व वाजवीपणा यांना तिलांजली देणारे आहे, असे न्या. व्ही. जी. पळशीकर व न्या. दिलीप भोसले यांच्या आदेशात म्हटले आहे.

हे सर्व अग्रलेख आपण लिहिले होते, जयश्री खाडिलकर यांचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही, असे नीळकंठ खाडिलकर यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र करून सांगितले, तर संपादक या नात्याने श्रीमती खाडिलकर यांनी त्या अग्रलेखांची जबाबदारी स्वत:वर घेतली. मात्र या आरोपातून त्यांना वगळण्याचे कारण नाही, त्याही सारख्याच दोषी आहेत, असे आदेशात म्हटले आहे.

### ❐ पोलिसांनीही गुप्तचरांसारखी भूमिका बजावावी

''देशात तसेच राज्यात 'इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स' या पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या घातपाती कारवाया येत्या काळात वाढण्याची शक्यता आहे. या रोखायच्या असतील, तर पोलिस यंत्रणेनेही गुप्तचर यंत्रणेसारखी 'वॉच डॉग' ची भूमिका करायला हवी.'' असे मत राज्याचे माजी पोलिस महासंचालक वसंत सराफ यांनी व्यक्त केले.

रुपा आणि कंपनी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या सराफ यांच्या 'द फेटल एन्टँगलमेंट अँड अदर स्टोरीज-एस्पिनॉज मिशन्स' चे येथील वितरण 'प्रिंट इन' तर्फे सुरू झाले.

गुप्तचर यंत्रणेकडे सरकारने पुरेसे लक्ष पुरवायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त करून श्री. सराफ म्हणाले, ''पोलिसांनीही घटना घडून गेल्यावर तपास करणे एवढीच भूमिका न बजावता अशा घटना घडूच नयेत यासाठी सतर्क राहायला हवे. घातपाती कारवायांची वाढती व्याप्ती लक्षात घेता सामान्य नागरिकानेही जागरूक राहायला हवे. सार्वजनिक ठिकाणी एखादी बेवारस वस्तू आढळली, तर ती बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून देणे महत्वाचे आहे.'' आपल्या पुस्तकाच्या प्रेरणेविषयी बोलताना ते म्हणाले, ''देशात आयएसआयच्या आणि दाऊद टोळीच्या वाढणाऱ्या कारवाया, त्याची भीषणता याविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे हा पुस्तकाचा हेतू आहे.''

### ❐ विठ्ठल, विष्णू आदी देवांची दोनशे वर्षांपूर्वीची तैलचित्रे सापडली

पंढरपूर येथील संतकवी अनंत महाराज बडवे यांनी सुमारे सव्वादोनशे वर्षांपूर्वी काढलेली विठ्ठल, विष्णू, वरदगणपती व चार भुजांचा मुरलीधर या दैवतांची जलरंगातील चार चित्रे त्यांचे वंशज विठ्ठल बडवे यांच्या दप्तरात मिळाली आहेत.

ही चित्रे अठराव्या शतकातील आहेत. संतकवी प्रल्हाद महाराज बडवे यांचे अनंतबुवा हे नातू होते. प्रल्हाद महाराजांनी अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'अमृतानुभव' या ग्रंथाचा संस्कृत अनुवाद केला होता. या ग्रंथासाठी अनंतबुवांनी विठ्ठलाचे सप्तरंगी चित्र काढले होते. ते चित्र व इतर तीन चित्रे त्यांचे वंशज वसंतराव बडवे यांना त्यांचे

वडील विठ्ठल बडवे यांच्या दप्तरात मिळाली आहेत. एवढ्या कालावधीनंतरही ही चित्रे ताजी वाटतात; मात्र त्यांची नेहमी पूजा होत असल्याने त्यावर गंधाच्या खुणा निर्माण झाल्या आहेत. ही चित्रे नऊ इंच रुंद व बारा इंच लांबीच्या जाड पुठ्ठ्यावर काढलेली आहेत. अनंतबुवांनी 'प्रदोष माहात्म्य', 'भरताख्यान', 'मल्हारी माहात्म्य', 'शिवरात्री माहात्म्य', 'गोपाळाष्टक' आदी ग्रंथ लिहिले आहेत; मात्र ते अद्यापही अप्रकाशित आहेत.

अनंतबुवांचे आजोबा प्रल्हाद महाराज हे संस्कृत पंडित होते. इस्लामी आक्रमणापासून विठ्ठलाच्या मूर्तीचे रक्षण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिवराज्याभिषेकासाठी त्यांना खास निमंत्रण देण्यात आले होते. संत तुकारामांची मूळ गाथा त्यांच्या संग्रहात होती. प्रल्हाद महाराजांचे वंशज अप्पाजी बडवे यांनी ती गंगूकाका शिरवळकर यांना दिली. आजही ती शिरवळकरांच्या वंशजांकडे आहे. त्यांनी रचलेले 'पांडुरंग माहात्म्य' आजही वारकऱ्यांच्या पारायणात आहे. त्यांनी रचलेली 'शरणागत तव चरणा, मजवरी करी करुणा' ही विठ्ठलाची आरती आजही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात म्हटली जाते.

## ❒ सुरेश खोपडे यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

''पोलिस यंत्रणेत सध्या वरिष्ठांनाही फारसे अधिकार राहिलेले नाहीत. शिपायाइतकेच अधीक्षकाला अधिकार असून, खरी सत्ता राजकीय पुढाऱ्यांकडेच आहे. राजकीय पुढारीही पोलिस हातात नसतील, तर राजकारणच नको असे म्हणतात. हे चित्र बदलण्यासाठी आता लोकांनीच पुढाकार घ्यायला हवा,'' असे मत निवृत्त विशेष पोलिस महानिरीक्षक भास्करराव मिसार यांनी व्यक्त केले.

'स्नेह प्रकाशन' व 'आशय' आयोजित कार्यक्रमात राज्य राखीव पोलिस दलातील कमांडंट सुरेश खोपडे यांच्या 'नावीन्यपूर्ण योजना' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. मिसार यांच्या हस्ते, तर 'नवी दिशा' पुस्तकाचे ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

श्री. मिसार म्हणाले, ''स्वातंत्र्यानंतर प्रशासनासाठी ब्रिटिश पद्धत कायम ठेवायला नको होती. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी फक्त नामधारी राहिले आहेत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी पोलिस प्रशासकीय यंत्रणेत बदल करण्याबाबत समिती नेमण्यात आली. तिच्या शिफारशीही मान्य केल्या गेल्या; परंतु त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न मात्र कोणत्याही पक्षाने अजूनही केलेला नाही. त्यामुळे सत्ता हातात घेण्यासाठी लोकांना आता विशेष प्रयत्न करावे लागतील.''

अरुण साधू म्हणाले, ''राज्य चालवण्यासाठी प्रशासन आवश्यकच आहे; मात्र प्रशासनच आता आपण राज्यकर्ते असे वागायला लागले आहे; पण हा फक्त प्रशासनाचा नव्हे, तर जगाच्या संस्कृतीत होत असलेल्या बदलांचाही प्रभाव आहे. संपूर्ण जग संक्रमणावस्थेतून जात आहे. त्यातून आपल्यालाही जायचे आहे. त्या पार्श्वभूमीवर या पुस्तकाची चर्चा व्हायला हवी.''

श्री. कुमार केतकर म्हणाले, ''एका पोलिस अधिकाऱ्याने येथील व्यवस्थेविषयी स्पष्टपणे लिहिणे सामाजिक बदलाच्या दृष्टीने एक मोठे पाऊल आहे. इतरही पोलिस अधिकाऱ्यांनी आपले अनुभव अशाप्रकारे मांडायला हवेत.'' गेल्या पन्नास वर्षांत नोकरशाहीने एकही नावीन्यपूर्ण गोष्ट केलेली नाही, असे नमूद करून श्री. खोपडे म्हणाले, ''नोकरशाहीला 'जैसे थे' परिस्थिती आवडते. यावरच शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे. 'हे कोण करणार', असा



विचार करत न बसता आपल्यापासून सुरुवात करायला हवी या भूमिकेतून मी हे पुस्तक लिहिले.'' संग्राम खोपडे यांनी सूत्रसंचालन केले.

## ❒ मराठी बालसाहित्याला गरज 'ओरिजिनल' हॅरी पॉटरची!

'हॅरी पॉटर' पुस्तकाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याने बालसाहित्याकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. यामुळे बालसाहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल, अशी आशा ज्येष्ठ साहित्यकार रत्नाकर मतकरी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा प्रा. बाबूराव शिरोळे बालसाहित्यकार पुरस्कार मतकरी यांना, तर शांतादेवी शिरोळे लेखिका पुरस्कार प्रसिद्ध विज्ञानलेखिका माधुरी शानभाग यांना ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांच्या हस्ते देण्यात आला.

'हरी पॉटर' सारखा नवा बालचरित्रनायक मराठीत निर्माण करता येईल का, याचा विचार झाला पाहिजे, असे सांगून मतकरी म्हणाले की, पूर्वी भा. रा. भागवत यांचा 'फास्टर फेणे' हा बालचरित्रनायक मराठी साहित्यात गाजला होता. पुस्तकांच्या खपामध्ये प्रकाशकांचेच प्रयत्न कमी पडत आहेत. पुस्तके विकत घेऊन वाचायला उत्सुक असलेल्या लोकांपर्यंत पुस्तके पोहचत नाहीत, मुलांसाठीची पुस्तके त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध युक्त्यांचा उपयोग प्रकाशकांनी केला पाहिजे. 'हॅरी पॉटर' च्या यशात प्रकाशकांनी वापरलेल्या विविध तंत्रांचा वाटा मोठा आहे, असे ते म्हणाले.

## ❒ भारत सासणे यांचे कादंबरीलेखन सशक्त

भारतात कादंबरी हा वाङ्मयप्रकार युरोप खंडातून आला असून, मराठी लेखकांनी त्यात चांगलेच नैपुण्य संपादन केले आहे. त्यामुळेच आता हा वाङ्मयप्रकार सशक्तपणाने युरोपात निर्यात व्हायला हवा आणि भारत सासणे यांच्या कादंबरीत ती शक्ती आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ कथाकार के. ज. पुरोहित यांनी भारत सासणे यांच्या लेखनाचा गौरव केला.

अनुष्टुभ प्रतिष्ठानच्या वतीने सुरू केलेला पहिलाच 'विभावरी मधुकर पाटील वाङ्मय पुरस्कार' भारत सासणे यांच्या 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' कादंबरीला प्रदान करण्याचा समारंभ वनमाळी सभागृहात पार पडला. लेखकाबरोबरच पुस्तकाचे प्रकाशक संजय भागवत (मौज) आणि मानपत्र बनविणारे कवी नलेश पाटील यांचाही सत्कार केला गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी 'अनुष्टुभ' तर्फे प्रा. गो. तु. पाटील यांनी, तर पाटील परिवाराच्या वतीने कवयित्री व कथालेखिका नीरजा यांनी पुरस्काराची पार्श्वभूमी विशद केली.

द्विस्तरीय पुरस्कार निवड समितीतर्फे बोलताना ज्येष्ठ कथालेखिका डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' कादंबरीच्या काव्यमय भाषेचा तसेच वैशिष्ट्यपूर्ण गुणांचा यथोचित गौरव केला. डॉ. पुष्पा राजापुरे-तापस यांनी ही कादंबरी समजून घेताना भारतीय परंपरेतील पापाची संकल्पना, भारतातील वतनदारीचा काळ, वर्णसंकर आणि अगदी अलीकडील स्त्रीमुक्तीचा विचार समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून समजून घ्यायला हवा, असे प्रतिपादन केले. कादंबरीत स्त्रीच्या ठायी असलेली परिवर्तनशील वृत्तीही त्यांनी सोदाहरणासह स्पष्ट केली.

सासणे म्हणाले, समीक्षक आणि वाचकांनी या कादंबरीला विविध मोजपट्ट्या लावल्या असल्या तरी माझ्यादृष्टीने त्यातील आत्मशोध महत्त्वाचा आहे. त्याहीपेक्षा त्यातील सामाजिकतेचा आत्मशोध महत्त्वाचा आहे. काहींना या कादंबरीत रहस्यमयता, रंजकता आणि गॉथिक शैली दिसते. त्याहीपेक्षा मला त्यात गुंतलेले समकालीन प्रश्न आणि त्या अनुषंगाने आलेली सामाजिकता महत्त्वाची वाटते.

समारंभाला मंगेश पाडगावकर, शंकर वैद्य, सरोजिनी वैद्य, डॉ. वसंत पाटणकर, रामदास फुटाणे, अशोक नायगावकर, मेघना पेठे, मिलिंद मालशे, सानिया आदी उपस्थित होते.

## ❒ नेमाडेंनी केला भाषांचा पंचनामा

'जागतिकीकरणाचा उदो उदो करणाऱ्या देशांतच सर्वाधिक भाषा नष्ट झाल्या आहेत.'

'आज कोणी मराठी *दुरितांचे तिमिर जावो* सारख्या ओळी लिहू शकणार नाही, कारण आपण इंग्रजीचे गुलाम झालो आहोत.'

'वाघ आपलं वंशसातत्य टिकवताना जंगलही टिकवतो. आपण आपल्या भाषेबद्दल वाघाइतकेही जागरूक नाही.'

'या देशाच्या इतिहासात झालेले मोठे सम्राट अशोक आणि अकबर हे मुख्य धारेतले नव्हते आणि ते हिंदूही नव्हते.'

'निराद चौधरींना आपलं आत्मचरित्र इंग्रजीत सात वेळा लिहावं लागलं, हे अभिमानास्पद वाटणं हे गुलामगिरीचं लक्षण आहे.'

...ही आणि अशी विधानं भालचंद्र नेमाडेंशिवाय कोण करणार? जागतिकीकरणाचा संस्कृतीच्या संदर्भात पंचनामा करणारी नेमाडेंच्या व्याख्यानाची पुस्तिका अलीकडेच लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केल्यावर वेगवेगळ्या वर्तुळांत तिची झपाट्याने दखल घेतली गेली आणि प्रेस क्लबने याच विषयावर नेमाडेंशी वार्तालाप घडवून आणला. मधुकर भावे, विद्याधर दाते, प्रदीप विजयकर आणि हरिश नंबियार हे ज्येष्ठ पत्रकार प्रश्न विचारतील आणि नेमाडे उत्तर देतील, अशी योजना होती. या चौघांसह अनेकांनी वेगवेगळ्या अंगाने नेमाडेंना प्रश्न विचारले आणि आपलं कुतूहल शमवून वा चाळवून घेतलं.

आंतरराष्ट्रीय प्रमाणकं अशी काही नसतातच, हे पहिल्यांदाच नेमाडे यांनी सांगून टाकलं. ते म्हणाले, ''माझ्यावर पहिला प्रभाव हा अजंठा लेण्यांतल्या चित्रांचा आहे. सॉक्रेटिसने स्थळ, काळ आणि अवकाशाच्या एकात्मतेचं प्रमाणक मांडलं. पण हे युरोपीय प्रमाणक अजिबात न मानता सिद्ध झालेली थोर गोष्ट आपल्याला या चित्रांच्या रूपाने दिसते. अशा खूप महत्त्वाच्या गोष्टी आपल्या परंपरेत आहेत. त्यांचं महत्त्व आपण आधी आपल्यालाच पटवून दिलं पाहिजे. आपली प्रमाणकं ही आपल्या जगण्यातूनच निर्माण होतात. एखादा शेतकरी, माथाडी कामगार, कष्टकरी आपल्या श्रमातून झिरपलेल्या दोन ओळी जेव्हा निर्माण करतो तेव्हा ते प्रमाणक असतं.''

नेमाडे यांनी जागतिकीकरणाच्या प्रभावात नष्ट झालेल्या भाषा, इंग्रजीचा वाढता प्रभाव, आपली बहुसांस्कृतिकता, इंग्रजी साहित्य प्रसवणारे देशी लेखक, जागतिक मराठी संमेलनं अशा अनेक मुद्यांना स्पर्श करीत आपला देशीवादी दृष्टिकोन स्पष्ट केला. ते म्हणाले, ''आपल्या देशात कधीच एक धर्म, एक संस्कृती, एक ग्रंथ अशी परिस्थिती नव्हती आणि ही अभिमान वाटावा अशीच गोष्ट



आहे. २०० वर्षांपूर्वीपर्यंत मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे श्रेष्ठ लेखक इथे झालेले दिसतात. आपण या परंपरेचा शोध घेतला पाहिजे. गांधी, आंबेडकर यांनी आपल्या लढ्याचं बळ या परंपरेतूनच मिळवलं. भाषा हे आपल्या परंपरेचं महत्त्वाचं अंग आहे. भाषेचा विकास हा त्या संस्कृतीचा विकास असतो आणि त्यातूनच आपला मानवी आणि जागतिक दृष्टिकोन तयार होत असतो. वसाहतवादाने मानसिकदृष्ट्या आपल्याला गुलाम केलं आहे. आपण त्यांची भाषा घेतो आणि त्यांचा दृष्टिकोनही. त्यामुळे आपल्याला पाश्चात्यांचं प्रशस्तिपत्रक लागतं. केंब्रिज विद्यापीठात पेपर वाचला की आपल्या शास्त्रज्ञांना कृतकृत्य वाटतं.'

'आपल्या तालुका पातळीवरच्या शिक्षकांनाही शेक्सपिअर, गटे, शॉ वगैरे माहीत असतात, पण त्यांना भास, पाणिनी माहीत नसतात. इंग्रजी माध्यमांच्या शाळा या धंदेवाईक दृष्टी ठेवून काढल्या जातात; पण आपल्या देशाविषयी काहीच माहिती न देता मुलांना या शाळात नर्सरी ऱ्हाईम्स म्हणायला लावणं, हे काही खरं नाही. शेवटी, काही थोर निर्माण व्हायचं असेल तर ते आपल्याच भाषेतून निर्माण होईल, परक्या भाषेतून नव्हे हे आपण लक्षात ठेवायला हवं.'

किपलिंग, देसानी, रश्दी वगैरे मोजकी नावं सोडली तर इंग्रजीतून लिहिणारे भारतीय लेखक दुय्यम दर्जाचे आहेत; असे आपलं जाहीर मत नेमाडे यांनी पुन्हा एकदा मांडलं. जागतिक मराठी संमेलन भरवणारे मराठीचे सर्वात मोठे मारेकरी आहेत, असाही टोला त्यांनी लगावला. असे अनेक टोले लगावत नेमाडे यांनी आपल्याला ऐकण्यासाठी जमलेल्या मंडळींना बरंच वैचारिक खाद्य पुरवलं.

## ❒ 'मधुमेह : एक आव्हान' पुस्तकाचे प्रकाशन

आजच्या विज्ञानयुगात मानवी जीवन फार गतीमान व धावपळीचे झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या कृपेने सुखसोयींचा वर्षाव अकल्पित वाढत असून त्यामुळे कष्ट कमी झाले आहेत. व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली, स्पर्धात्मक शिक्षण, प्रचंड मानसिक तणाव व ै.म्दस युगातील खाण्यापिण्यातील चंगळवाद व फास्ट फूड कल्चर यामुळे दिवसेंदिवस मधुमेहाचे प्रमाण जगभरात व विशेषत: भारतामध्ये झपाट्याने वाढत आहे. हा रोग फक्त नावापुरताच गोड आहे. काहीही लक्षणे नसताना चोर पावलांनी शरीरात घुसून शरीर पोखरुन काढणाऱ्या रोगाबद्दल गैरसमजही अनेक आहेत. प्रचलित गैरसमज दूर व्हावे, येणाऱ्या पुढील पिढीचे या वाळवीपासून संरक्षण व्हावे व व्याधीग्रस्त रुग्णांमध्ये कमीतकमी गुंतागुंती व्हाव्यात, या हेतूने डॉ. अरुणा जैन व डॉ. अशोक बिरबल जैन यांनी आपल्या २० वर्षाच्या वैद्यकीय अनुभवातून, परिश्रमातून लिहिलेले पुस्तक म्हणजे 'मधुमेह : एक आव्हान.'

रविवार दिनांक २९ जून रोजी विदर्भाचे सरस्वतीपुत्र व अधिष्ठाता स्नातकोत्तर समिति श्ण्घ्, डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते व जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. अरुणा जैन व डॉ. अशोक बिरबल जैन यांच्या 'मधुमेह : एक आव्हान' या सोप्या मराठी मायबोलीत लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकात मधुमेह प्रतिबंधासाठी आवश्यक ते जीवनशैलीतील बदल आवर्जून सांगितलेले आहेत. तसेच मधुमेहासाठी जबाबदार घातघटक, निदान, औषधोपचार, अचानक व दीर्घकालीन होणाऱ्या गुंतागुंती या सर्वावर प्रकाश टाकण्यात आला आहे व विशेष प्रसंगी म्हणजे प्रवासात, आजारपणात, गर्भावस्था, बाल्यावस्था व वृद्धापकाळात मधुमेह

झाल्यास कोणती विशेष काळजी घ्यायची याबद्दल विस्तृत विवेचन केले आहे.

डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी या पुस्तकाची तुलना रस्किन बॉडचे प्रसिद्ध पुस्तक ‘अनटू द लास्ट’ याच्याशी करुन जैन दाम्पत्याचे अभिनंदन केले. हे पुस्तक महाराष्ट्रातील अग्रगण्य प्रकाशनसंस्था मेहता पब्लिशिंग हाऊस यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आले. श्री. मकरंद पाठक व श्री. सचिन अग्निहोत्री यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने जैन हॉस्पिटल वर्धा तर्फे रविवार दिनांक २९ जून ०३ रोजी जय महाकाली शिक्षण संस्थेच्या राणीबाई अग्निहोत्री कॉलेज परिसरात एक दिवसीय कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले.

सकाळी ९.३० वाजता वर्ध्यातील डॉक्टरांकरीता निरंतर वैद्यकीय शिक्षण (ण्ई) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुमारे १५० डॉक्टरांनी भाग घेतला.

दुपारी २ वाजता वर्ध्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. चौकलिंगम यांचे हस्ते कार्डिओ-डायबेटॉलॉजी २००३ या आरोग्य प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरले. जैन हॉस्पिटल मध्ये उपलब्ध केली गेलेली जागतिक दर्जाची उपकरणे.

वर्धा किंवा आजूबाजूच्या गावांमध्ये इतर ठिकाणी उपलब्ध नसलेल्या यो सोयींमुळे जिल्हाधिकारी उपस्थित डॉक्टर्स व इतर प्रतिष्ठित मंडळींनी याबद्दल डॉ. जैन यांचे अभिनंदन केले व भविष्यातही अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत विनंती केली. या प्रदर्शनामध्ये व्यायाम, योगाभ्यास व कमी उष्माकाचे पदार्थ यावरही माहिती देण्यात आली. सुमारे १५०० लोकांनी या प्रदर्शनीचा लाभ घेतला.


**‘वाट तुडवतांना’**

पत्रकारिता आणि साहित्य जीवनाच्या विविध अंगांना काय देऊ शकतात याचा लेखा जोखा मांडणारी एका संपादकाच्या जडण घडणीची आत्मकथा

किंमत : १८० रुपये
पृष्ठे : १९१

**लेखक श्री. उत्तम कांबळे**
संपादक, दैनिक सकाळ, नाशिक
प्राचार्य प्रभाकर बागले यांची विवेचक प्रस्तावना

प्रकाशक : **शांभवी प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स,**
७२, टिळकनगर, औरंगाबाद. दूरध्वनी : ०२४१-२३३८९२५







## शेखचिल्लीचे किस्से

**हजरजबाबी, चतुर आणि चलाख शेखचिल्लीच्या डोकेबाज कल्पनांचा धमाका!**

**डॉ. निर्मला सारडा**

शेखचिल्ली ही एक हजरजबाबी चलाख वल्ली. बिरबल, नसरुद्दिन, तेनालीराम यांच्या जातकुळीतली. आपल्या बुद्धिचातुर्याने भल्याभल्यांना चकवणारी. कधी कधी मूर्खपणा करणारी, पण त्यातही काहीतरी विलक्षण शहाणपणाची क्लृप्ती दाखवणारी. अजब युक्तिवाद करून चक्रावून सोडणारी. असा शेखचिल्ली हा कधी तरी होऊन गेला असणार; आणि त्याच्या नावावर लोक त्याच्या आयुष्यात न घडलेल्या पण गमतीदार अशा बऱ्याचशा कथा-दंतकथा खपवत असणार हेही खरेच! त्यामुळेच बिरबल, नसरुद्दिन, तेनालीराम यांच्या मालिकेत त्याला स्थान मिळाले असणार, हेही उघडच आहे.

या अशा अजबराव शेखचिल्लीच्या काही गमतीदार गोष्टींची झलक बघायची असेल तर ‘शेखचिल्लीचे किस्से’ हे बहुरंगी चित्रांनी नटलेले पुस्तक वाचायला हवे. कॅडबरीचा बाजार, कविता कॉम्प्युटरच्या, चांदोबाच्या कविता, गंमतगाणी, गमतीदार भाडेकरू, १०१ औषधी वनस्पती वगैरे पुस्तकांच्या लेखिका बालसाहित्यकार डॉ. निर्मला सारडा यांनी हे ‘किस्से’ मराठीत आणले आहेत आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने ते मोठ्या दिमाखदारपणे प्रसिद्ध केले आहे.

हा शेखचिल्ली चलाख आहे आणि मनुष्य स्वभावाचा मोठा जाणकार आहे. टांग्याचा धक्का लागून म्हातारी अमीनाबी रस्त्यावर बेशुद्ध होऊन पडते, तेव्हा जमलेले बघे लोक तिला वारा घालतात, तिच्या नाकासमोर कांदा धरतात. पण ती काही शुद्धीवर येत नाही. योगायोगाने शेखचिल्ली तेथे येतो आणि अमीनाबीला ओळखून म्हणतो, ‘‘अरे तिला शुद्धीवर आणायचा एकच मार्ग आहे. शेजारच्या त्या हलवायाकडून द्रोणभर गरमागरम जिलबी घेऊन या.’’ लोक बुचकळ्यात पडतात. पण जिलबीचे नाव घेताच अमीनाबी खरोखरच शुद्धीवर येते. का ? ती भयंकर खादाड असते आणि जिलबी म्हटले की तिच्या तोंडाला पाणी सुटते. अमीनाबीचा हा ‘वीक पॉईंट’ म्हणा की आवडीचा भाग म्हणा, शेखचिल्ली त्याचा वापर करून तिला बरोबर

शुद्धीवर आणतो. कोणाचे काय वर्म आहे आणि त्याचा कसा उपयोग करावा याचे ज्ञान शेखचिल्लीला असते; आणि त्याचा तो फायदा घेऊन तो इतरांना थक्क करून सोडतो.

कधी कधी तो लोकांच्या फिरक्याही घेतो. लोक जे शब्दप्रयोग करतात, त्यातल्या गफलती दाखवून त्यांची खिल्ली उडवतो. एक नवखा प्रवासी त्याला विचारतो, ''शेखसाहेबांच्या घराकडे कुठला रस्ता जातो?'' शेखचिल्ली म्हणतो, ''शेखसाहेबांच्या घराकडे कुठलाच रस्ता जात नाही.'' आणि पुढे स्पष्टीकरण करताना सांगतो, '' हे रस्ते आहेत तेथेच राहतात. ते कुठे चालत जात नाहीत. रस्ते जागच्या जागीच असतात. शेखसाहेबांचे घर कुठे आहे, असे विचारा. तर मी पत्ता सांगतो. या रस्त्याने सरळ चालत जा. त्याच्या टोकाशी शेखसाहेबांचे घर आहे.'' सांकेतिक अर्थ आणि सरळ अर्थ यांच्यातील फरक जाणून लोकांच्या फिरक्या घेण्यासाठी भाषेवर प्रभुत्व लागतेच. विनोदी लेखक अशा शब्दयोजनांमधल्या गमतीजमतींचा वापर करून, कोट्यांची धमाल उडवतात.

दोन दारुडे खूप पिऊन ताजमहालजवळ, तो विकून किती पैसे मिळावेत याबद्दल सौदा करीत असतात. एकजण म्हणतो, ''मी दहा हजार देईन.'', दुसरा म्हणतो, ''ते फार कमी होतात. कमीत कमी वीस हजार तरी हवेत मला.'' पहिला म्हणतो, ''फार जास्त पैसे मागतोस, मला नाही झेपणार.. फार फार तर पंधरा हजार देईन.'' त्यांची जोरजोराने अशी हुज्जत चाललेली असताना शेखचिल्ली त्यांना विचारतो, '' कशाबद्दल सौदा चाललाय तुमचा?'' ते दोघे ताजमहालबद्दल असे उत्तर देऊन म्हणतात, ''हा फक्त पंधरा हजारच देतोय. मी वीस हजार मागतोय.'' - आता शेखचिल्लीचे यावर काय उत्तर असणार ? तेच तर धमाल उत्तर आहे. त्यामुळे शेखचिल्लीचे चातुर्य हे आपल्या मनावर ठसते.

असे काय उत्तर असणार त्याचे ?

शेखचिल्ली म्हणतो, ''पण मला मुळी हा ताजमहाल विकायचाच नाही. वीस हजारात नाही अन् पंधरा हजारातही नाही.''

- आणि त्यावर एक दारुडा दुसऱ्याला म्हणतो, ''बघ, तू आवाज चढवला नसतास तर या मालकाला पत्ता लागला नसता.''

दुसरा उत्तर देतो, ''पंधरा हजारांवर तू राजी झाला असतास तर सौदा कधीच झाला असता. आता गेले की सगळेच!''

- अशा मजेशीर कल्पनांमुळे या चिरपरिचित गोष्टी या पुन:पुन्हा वाचाव्याश्या वाटतात. जगभरच्या मुलांना - आणि मोठ्यांनाही त्या पिढ्यानुपिढ्या हसवत, रिझवत राहतात. मानवी स्वभावाचे, विसंगतीचे, गुणदोषांचे एक वेगळेच रूप त्या दाखवतात. शहाणपण, चातुर्य, हजरजबाबीपणा याद्वारे अवघड अडचणीतूनही कसा मार्ग निघू शकतो याचीही नकळत त्या शिकवण देतात.

मुलांच्या कल्पनाशक्तीला त्या वेगवेगळ्या वाटा दाखवतात. त्या त्या संस्कृतीच्या वैशिष्ट्यांची आणि समाजाच्या नीतिमूल्यांचीही जाणीवही अप्रत्यक्षरीत्या करून देतात.

**पृष्ठे : ३२ ● किंमत : २५ रु. ● सभासदांना : १९ रु. ● पोस्टेज : २० रु.**






## काही खरं काही खोटं

# वपुंच्या कल्पना चमत्कृतीच्या अजब गजब भराऱ्या

**व. पु. काळे**

वपु काळे यांच्या प्रतिभेची एक खासियत म्हणजे त्यांची कल्पकता. फँटसीच्या अंगाने जाणारी त्यांची अचाट कल्पनाशक्ती. अशी अफलातून कल्पकता मराठी लेखकांमध्ये क्वचितच आढळते. भा. रा. भागवत (मायापूरचे रंगेल राक्षस), अशोक पाटोळे (सातव्या मुलीची सातवी मुलगी), इ. अद्भुतरम्य काल्पनिक जगाची निर्मिती करणारी कल्पकता वपु काळे यांच्यात नव्हती, पण कल्पना चमत्कृतीत त्यांचा हातखंडा होता. त्या चमत्कृतिपूर्ण कल्पना एका मर्यादेपर्यंत ते फुलवत जात आणि धमाल उडवून देत; आणि आता एवढेच पुरे म्हणून एका टप्प्यावर थांबत. त्या चमत्कृतिपूर्ण कल्पनेच्या आधारे विशिष्ट समाजाची वा जगाची उभारणी करण्याएवढी उसंत त्यांना नसे. कथाकथनाचे प्रयोग रंगू लागल्यावर चमकदार भन्नाट कल्पनांद्वारे वाक्यावाक्यात हशा मिळवण्याची त्यांना जणू खोडच लागली. त्या मोहामुळे त्यांच्या कल्पकतेची उड्डाणे मध्यमवर्गीयांना गुदगुल्या करणे, चिमटे घेणे यातच जास्त रंगत गेली.

वपु. काळे यांना कल्पनाचमत्कृतीची एक सिद्धीच लाभली होती. 'आहे त्यापेक्षा थोडी वेगळी परिस्थिती, थोडी उलटापालट झाली तर-?' हे त्यांच्या चमत्कृतिपूर्ण कल्पकतेचे मुख्य केंद्र असे. उदाहरणार्थ, तुमचा आजार तात्पुरता आपल्यावर घेणारा कोणी भेटला तर आपले व्याख्यानदौरे वा कथाकथनाचे कार्यक्रम निर्वेधपणे चालू राहतील. दुसऱ्यांचे आजार तात्पुरते स्वीकारणारी भदे ही व्यक्तिरेखा वपु काळे यांनी निर्माण केली. त्या भदेच्या माध्यमातून वपु काळे, मंगेश पाडगावकर, सुधीर फडके, पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या कलावंतांचे आजारपण तात्पुरते दूर होऊन, त्यांचे कार्यक्रम निर्धोक चालू राहतात, ही कल्पना या दोहोंनाही सोयीची! परंतु एखादी व्यक्ती भादेच्या या सौजन्याचा गैरफायदा घेऊन चार दिवसानी त्याचा आजार परत घेण्याऐवजी परदेशी निघून गेली तर? आली का पंचाईत? आणि तशात ती व्यक्ती स्त्री असली

आणि पुन्हा गरोदर - तर मग? धमालच! वपु काळे यांनी भदेला अशा अवघडलेल्या अवस्थेत पेश करून वाचक-श्रोत्यांना एकदमच चक्रावून टाकण्यात कसूर ठेवलेली नाही. गरोदरपण हे आजारपणात येते का, आणि भदेसारख्या पुरुषाला त्या अनुभवातून जाणे जमावे का - एवढे तारतम्य कल्पकतेच्या चमत्कृतिपूर्ण उड्डाणात रमल्यावर बाळगावे अशी अपेक्षा अर्थातच वाचकांची वा श्रोत्यांची नसते, हेही खरे!

डॉक्टर, वकील किंवा अन्य व्यावसायिक तरुणीशी लग्न झाले तर काय होते ? तेच एका जादूगार तरुणीशी लग्न झाले तर काय फरक पडेल? अशी कल्पना एकदा डोक्यात आली की मग विवाहसमारंभात काय गंमतजंमत होऊ शकेल याबद्दलही अनेक चमत्कृतिपूर्ण आडाखे बांधता येतात; आणि पुढे दैनंदिन जीवनातही या जादूमुळे काय धमाल उडू शकेल यावर रंगतदार कथानकाची उभारणी करता येईल, नाही का? वपुंनी हीच कल्पना घेऊन तिला कसे फुलवले आहे ते 'एक हातसे ताली बजाव' या कथेत आपल्याला बघायला मिळते.

रचना ही जादूचे प्रयोग करणारी तरुणी. आंतरराष्ट्रीय कीर्तीची जादूगार. दर्शनशी तिचे लग्न ठरते. लग्नसमारंभाच्या वेळी दर्शन तिच्या सौंदर्याने सारेजण स्तिमित होताहेत हे बघून तिला म्हणतो, ''तू साक्षात अप्सरेसारखी दिसतेस. तुला कडकडून मिठी मारावीशी वाटते.'' ती म्हणते, '' इतकंच ना? मग मार की मिठी!'' दर्शन म्हणतो, ''तू परवानगी दिलीस खरी, पण काय फायदा ? समोरची ही जत्रा-'' ती म्हणते, ''समोरच्या जत्रेचा आणि आपला काय संबंध? आपलं राज्य वेगळं आहे'' मी मात्र हिप्नॉटिझम करू शकते.'' आणि रचना त्याला चक्क मिठी मारते. समोर दर्शनचे वडील येऊन उभे राहतात, पण त्यांच्या चेहऱ्यावर त्या मिठीचा काहीच परिणाम दिसत नाही. फोटोतही ते नॉर्मलच येतात... रचनाची शिष्या विशाखा येते. रचना विशाखाला गच्च मिठी मारून दाखवते व विचारते, ''आम्ही मिठी मारली ते कळलं तुम्हाला? नाही ना?'' आणि ती नवऱ्याला चॅलेंज देते. ''माझे बाबा येताहेत. त्यांच्यासमोर मला मिठी मार'' दर्शन तिच्या या रुपाने व करामतीने बावरतो. ''हनीमूनला जाऊ तेव्हा तूच बरोबर असणार ना? की तुझी जादूची प्रतिकृती?'' असा प्रश्न त्याला पडतो. तेव्हा ती आश्वासन देते, ''आपण दोघे खरेखुरे जाऊ. मलाही तो अनुभव घ्यायचा आहे. सगुण आकाराचे आनंद सगुण साकार होऊनच लुटायला हवेत.'' आणि ती शृंगाररसात त्याला न्हाऊन काढते. मधुचंद्राहून परतताना दर्शनला तर वाटते की आपला पुनर्जन्मच झालाय. चमत्कार या रचनाच्या बंगल्यात तो रहायला जातो. बघतो तर खिडक्यांना झडपा नाहीत. काचा नाहीत. ती म्हणते, ''दारे खिडक्या यांच्यावर इतका खर्च करायचा तर जादू कशाला शिकायची?'' दरवाजे नसलेल्या चौकटीतून दर्शन पलीकडे जायचा प्रयत्न करतो, तर चक्क भिंतीवर आदळल्यासारखा आपटतो.

... एकदम वीस पाहुणे घरी आले. घरात दूध नाही. तरी फक्त त्यांच्यापुढे गरम पाणी भरलेले कप ती ठेवते. आणि ते पिऊन 'काय मस्त चहा झालाय. कुठली पावडर वापरता.' असे पाहुणे विचारतात. त्यापैकी एका पाहुण्याला ती म्हणते, ''तुम्हाला मी मोर करते.'' तो



म्हणतो, ''मग माझ्या बायकोला लांडोर करा... किंवा नको, शेजारच्या चक्रवर्तीच्या बायकोला लांडोर करा. मग मी आयुष्यभर मोर रहायला तयार आहे.'' त्यावर रचना त्याला बजावते, ''पण मग चक्रवर्ती तुमच्या बायकोला आवडू लागला तर?'' तेव्हा तो पाहुणा सोमण हादरतो, ''नको, नको. तसं नको.''

या जादूगार बायकोमुळे दर्शनचे सगळे जीवनच बदलते. वपुंच्या भराऱ्या बघा.

● ऑफिसला जायला लेट झाला; तरी जा. रिस्टवॉचवर फक्त फुंकर मारा. घड्याळ मागे गेलेले असेल. तुम्ही इनटाईमच असणार.

● आंघोळ झाल्यावर उघड्या अंगाने घरभर हिंडा. कुणाच्या लक्षात येणार नाही.

● मध्येच पेट्रोल संपले, घाबरू नका. गाडी मुक्कामापर्यंत जाईल.

● महाराष्ट्र वीज मंडळाची वीज गेली. जाऊ द्या. घरात वीज चालूच राहील.

● गॅस संपायच्या आधीच पाच दिवस सूचना मिळते.

दर्शन एकदा म्हणतो, ''घरात रात्री चांदणे पडल्यावर नवा मोठा तलाव तयार व्हावा. मग पोहू या.'' आणि तसा तलाव तयार करून ती त्या तलावात दर्शनला चक्क ढकलतेही!

- आता या एवढ्या कल्पनांच्या भराऱ्या घेतल्यावर ही कथा वपु कुठे थांबवणार ? असा प्रश्न नक्कीच पडणार!

- पण ते येथे सांगण्यात मतलब नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कथाच वाचायला हवी.

वपु हे मध्यमवर्गीय आणि मध्यमवर्गीयांचे आदर्श. तेव्हा मध्यमवर्गीय मूल्ये त्यांना प्रमाण! आपली बायको ही सुगरण हवी, पाहुण्यांचे आगतस्वागत करणारी हवी ही प्रत्येक मध्यमवर्गीय नवऱ्याची अपेक्षा असणारच. आता समजा, आपल्याला मिळालेली बायको स्वयंपाक करण्याबाबत निरुत्साही वा अडाणी असेल तर?...

वपुंच्या 'अचपुकबाश्री बुंजिक मोघी' कथेतील राजाभाऊंची नवपरिणित बायको श्यामा ही खरोखरच शोभेची बाहुली होती. तिच्या माहेरी चुलीकडे तिला कधी फिरकावे लागले नव्हते. तिचा आणि स्वयंपाकाचा संबंध फक्त जेवणापुरता! लग्न ठरल्यावर अगदीच अडू नये म्हणून तिच्या आईने तिला चार पदार्थ शिकवले एवढेच! लग्नानंतर स्वयंपाकीण बाई ठेवून ती घर चालवी.

या श्यामाला एक महिला क्लबचे सेक्रेटरीपद देऊन दरमहा एक नवा पदार्थ क्लबच्या बायकांना घरी मिटींग घेऊन खाऊ घालायची जबाबदारी टाकली. आता श्यामाने हे खास पदार्थ बनवण्यासाठी आपल्या सासूला पाचारण केले. पण ती आली नाही. मग वपुंनी त्या क्लबच्या एकेका बाईलाच एकेका खास पदार्थासाठी घरी आमंत्रित करून ते पदार्थ आईने केल्याचा आव आणायचा बनाव श्यामाच्या नकळत रचला. पण हा असा प्रकार शेवटी कुठेतरी उघडकीस येणारच!

त्याचा परिणाम काय होणार?.. मंडळात झालेल्या बदनामीमुळे श्यामाचा स्वाभिमान उफाळून येणार आणि लग्नाच्या वेळी मिळालेल्या पाकशास्त्रावरच्या पुस्तकाला ती उराशी धरणार. हे उघडच आहे.

'शब्द संपावर जातात' ही कल्पना वपुंना सुचते. आता या संपाचे प्रात्यक्षिक व व्यावहारिक रुप कसे दाखवायचे?

चलाख वपु त्यासाठी दोन सोयी करतात. एकतर विशिष्ट शब्द उच्चारले किंवा लिहिले तर त्याजागी दुसरेच शब्द येणार. उदाहरणार्थ, 'पुढारी' लिहिले तर ते पेंढारी असे लिहिले जाणार. वृत्तपत्रातही ते पेंढारी असेच येणार. लोकशाही लिहिले तर तेथे ठोकशाही असेच दिसणार. विकासाच्या ठिकाणी विकार येणार. 'अमुक अमुक पक्षाचे पेंढारी म्हणाले, विकाराशिवाय ठोकशाही टिकणं अशक्य!' यासारख्या बातम्या वाचून सगळीकडे गोंधळ उडणार! खोटी आश्वासनं देणाऱ्या जाहिराती मग उमटतच नाहीत. अर्थहीन गाण्यांचे कारखाने बंद पडतात. शब्दांची साथ संपल्याने सूर पोरके होतात. छापलेली रेल्वे वेळापत्रके कोरी राहतात. समीक्षेतील 'जीवनाचा तळ शोधताना असमर्थ ठरलेली कथा' यासारखे शब्द असहकार पुकारतात. आटपाटनगरीचं मंत्रीमंडळ हादरून जातं.

- याचा शेवट? पुन्हा तोच सल्ला द्यावा लागणार. शब्द ही कथा वाचा.

''मला स्वर्गात कंटाळा आलाय. मी पळून पृथ्वीवर आलेय. पुन्हा एकवार हस्तिनापूरापासून कुरूक्षेत्रापर्यंत सगळा प्रदेश पाहावासा वाटतो.'' असे म्हणणारी द्रौपदीच वपुंच्या बरोबर रेल्वेने प्रवास करून त्यांच्या कथाकथनाला सातारा मुक्कामी हजर राहते. डाकबंगल्यावर रात्रभर त्यांच्याबरोबर राहून नंतर निरोप घेते. नंतर वपु आपल्या मुंबईतल्या घरी जातात. पत्नीच्या सरबत्तीला बगल देऊन पुढच्या दौऱ्यावर निघतात. या दौऱ्यात त्यांच्या रेल्वे डब्यात चक्क उर्वशीच त्यांच्या सोबतीला येते. नाशिकला स्टेशनवर वपु उतरतात तेव्हा त्यांच्याबरोबर उर्वशी आणि द्रौपदी या दोघींना बघून नाशिककर खूष होतात. पत्रकार कुलदेव त्यांना गाठून विचारतो, ''या दोघी तुमच्या कोण ते सांगा.'' तर पाच पांडव तेथे येऊन टपकतात. क्षमा मागणाऱ्या वपुंना धर्मराज म्हणतो,'' वपु उठा. भीमा, शरणागत वपुंना अभय दे.'' द्रौपदी निरोप घेताना म्हणते,''तुमच्या कथांनी मला आनंद दिला.'' उर्वशी मात्र रेल्वे डब्यात येते. पण तिचा आवाज चक्क पुरुषाचा. ''आपण?'' ''मी अर्जुन.'' मग उर्वशी कुठे गेली?'' ''उर्वशी नव्हतीच. बृहन्नडा होती ती! म्हणजेच मी अर्जुन.''

- अशा चमत्कृतिपूर्ण कल्पनेच्या भराऱ्यांनी वपु आपल्या श्रोत्यांना आणि वाचकांना चक्रावून सोडत.


आजही त्यांची भूल पडते. या कथा वाचताना पुढे काय होणार याची उत्कंठा सतत वाटत राहते. वपुंच्या कल्पकतेची आणि मानवी स्वभावाच्या अकल्पित अनाकलनीयतेची नवनवी रुपे झपाटत राहतात.

**पृष्ठे : ९२ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ९० रु. ● पोस्टेज : २० रु.**

**वपु साहित्य म्हणजे फॅन्टसीची अनोखी सफर ... एक अफलातून आनंदयात्रा**



पुस्तक परिचय




## मधुमेह - एक आव्हान

**मधुमेहाबरोबर गुण्यागोविंदाने राहता येते, पण त्यासाठी पंचसूत्रीचा अवलंब हवा.**

**डॉ. अरुणा जैन, डॉ. अशोक बिरबल जैन**

वर्धा येथील रामनगर भागात मधुमेह, हृदयरोग आणि अस्थमा निवारण यासाठी दूरवर ख्याती पसरलेले जैन हॉस्पिटल म्हणजे डॉ. अरुणा जैन आणि डॉ. अशोक बिरबल जैन यांच्या दृष्टीने एक रुग्णसेवेची प्रयोगशाळाच आहे. अरुणा जैन यांनी ऑक्टोबर १९७३ च्या एसएससी परीक्षेत बोर्डात प्रथम येण्याचा मान पटकवला. महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेसमधून एमबीबीएस व एम.डी. पदव्या मिळवून जैन दांपत्याने वर्धा येथे आपले हॉस्पिटल गेली पंधरा वर्षे चालवले आहे. ॲलोपथीचे पदवीधर असूनही होमिओपॅथी, आयुर्वेद, निसर्गोपचार वगैरे पर्यायी औषधप्रणालींचा अभ्यास करून रुग्णांना जास्तीत जास्त लौकर आराम पडावा या दिशेने त्यांचे प्रयोग चालू असतात. त्यासाठी औषधोपचाराबरोबरच योगासने, ताणतणाव नियोजन, आहार संतुलन यांचीही माहिती ते देतात. मधुमेह, दमा आणि हृदयरोग हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय आहेत आणि आलेल्या रुग्णांच्या अनुभवावरून त्यांनी अनेक ठोकताळेही बसवलेले आहेत. त्याआधारे समाजाला या व्याधींबद्दलची नेमकी माहिती देऊन, त्यांचा एकतर वेळीच बंदोबस्त करणे व त्या व्याधी होऊच नयेत अशा प्रकारच्या जीवनशैलीचा अवलंब करणे या दृष्टीने मार्गदर्शनपर उपक्रम ते सातत्याने राबवत असतात. 'दमा' या विषयावर त्यांनी प्रथम एक पुस्तक लिहिले. ते वाचकांना आवडले. आता 'मधुमेह' या विषयाची सर्वंकष हाताळणी करणारे 'होलिस्टिक ॲप्रोच'ने लिहिलेले पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मराठी वाचकांसमोर येत आहे.

मधुमेहासंबंधी समाजात खूप गैरसमज आहेत, हे त्यांना पदोपदी जाणवते; त्या गैरसमजांमुळे मधुमेही व्यक्तींना वेळीच डॉक्टरकडे जाण्याची आच जाणवत नाही आणि त्यांचा त्रास वाढत जातो.

हे गैरसमज कुठले असतात?

१. मधुमेह हा फक्त श्रीमंतांचा आजार आहे.
२. मधुमेह हा फक्त मोठ्या व्यक्तींनाच होतो. लहान मुलांना होत नाही.
३. गोड पदार्थ किंवा साखर खाल्ल्याने मधुमेह होतो. साखर सोडली तर मधुमेहाची भीती उरत नाही.
४. मधुमेह हा अनुवंशिक रोग आहे. आईवडिलांच्या घराण्याकडून वारसा नसेल तर मधुमेह होत नाही.
५. केवळ लघवीची चाचणी करून मधुमेहाचे निदान होऊ शकते.
६. मधुमेही व्यक्तींनी भात, बटाटा, गोड पदार्थ, साखर अजिबात खाऊ नये.
७. औषधाद्वारे मधुमेह आटोक्यात आला की औषध बंद करावे.
८. औषध चालू झाल्यावर खाण्यापिण्याची पथ्ये न पाळली तरी चालते.
९. रक्त तपासणीच्या दिवशी इन्शुलिन अथवा तोंडाद्वारे घ्यायच्या गोळ्या घेऊ नयेत.
१०. इन्शुलिन एकदा सुरू झाले की जन्मभर घेत रहाणे क्रमप्राप्त ठरते.
११. मधुमेह हा औषधांनी पूर्ण बरा होऊ शकतो.
१२. मधुमेह स्थूल वा लठ्ठ व्यक्तींना जास्त होतो.
१३. बैठी कामे करणाऱ्यांमध्ये मधुमेहाचे प्रमाण जास्त दिसते.
१४. मानसिक तणाव हे मधुमेहाचे एक मुख्य कारण. ताणतणावाद्वारे जी हार्मोन्स तयार होतात त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते.
१५. भारतीय वंशाच्या व्यक्तींमध्ये मधुमेहाचे प्रमाण सर्वात जास्त आढळते. भारत ही मधुमेहाची जागतिक राजधानी म्हणून ओळखली जाते. भारतात दर हजार व्यक्तीतील पस्तीस व्यक्ती आज मधुमेही आहेत. म्हणजे आजमितीला साडेतीन कोटीवर मधुमेही व्यक्ती भारतात आहेत. ही संख्या इ. स. २०२५ पर्यंत सहा कोटींवर जाईल असा जागतिक आरोग्य संघटनेचा अंदाज आहे.

डॉ. जैन दांपत्याने या पुस्तकात मधुमेहासाठी जबाबदार घातघटक, मधुमेहाची लक्षणे, उपचार, आहार संतुलन, औषधोपचार, लिपिड प्रोफाइल, (हृदय, रक्तदाब, पाय, डोळे, मूत्रपिंडे, मज्जातंतूचे विकार, त्वचा, लैंगिक समस्या, हाडे व सांधे, गरोदरपणा इ.) मधुमेहींनी घ्यायची काळजी, स्वयंनियंत्रण, उपवास, प्रवास अशा विविध विषयांचा अगदी थोडक्यात पण सर्वांगीण परामर्श घेतला आहे. मधुमेहाचा प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने संतुलित आहार, नियमित व्यापार, सकारात्मक दृष्टीकोन, मांसाहार-धुम्रपान-मद्यपान यांचा त्याग, दैनंदिन ताणतणावाचे नियोजन, रक्तशर्करा वाढवणाऱ्या द्रव्यांचा व औषधांचा किमान वापर, याबाबत सावध असायला हवे.

डॉ. जैन दांपत्याने मधुमेहाच्या उपचाराबाबत पंचसूत्री कार्यक्रम सुचवला आहे, आणि या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणून त्या पंचसूत्रीकडे बघायला हवे. या पंचसूत्री कार्यक्रमाचा वा उपचारप्रणालीचा अवलंब केला तर मधुमेह हा एक शत्रू न वाटता सखासोबती म्हणून आपल्या



बरोबर त्याला नांदवता येईल आणि मधुमेह हा एक रोग नाही तर तो एक जीवनमार्ग आहे असे प्रत्ययाला येऊ शकेल, असा त्यांचा दावा आहे.

या पंचसूत्री उपचारप्रणालीत पुढील बाबींचा समावेश आहे.
१. संतुलित आहार- कमी स्निग्धांश असलेला व तंतुमय पदार्थ जास्त असणारा शाकाहारी आहार.
२. नियमित व्यायाम
३. औषधोपचार (गोळ्या व इन्शुलिन)
४. नियमित वैद्यकीय तपासणी
५. मानसिक तणावाचे नियोजन होईल अशी जीवनशैली. (वैयक्तिक संबंध सकारात्मक ठेवणे, धूम्रपान-मद्यपान वर्ज्य, राग आटोक्यात ठेवणे, योगाभ्यासाद्वारे मन:शांती)

मधुमेहाला 'सायलेन्ट किलर' असे म्हणतात. कारण आरंभीच्या काळात त्याचे काहीच दुष्परिणाम जाणवत नाहीत. त्याचे दीर्घकालीन परिणाम मात्र भयावह ठरतात. उदा. रक्तवाहिन्या व मज्जातंतू यांना इजा, पक्षाघात, अंधत्व, हृदयविकार, मूत्रपिंडे निकामी होणे.

मधुमेहाचे मुख्यत: दोन प्रकार आहेत. (१) इन्शुलिन अवलंबी मधुमेह. पाच ते दहा टक्के मधुमेही या प्रकारात येतात. शरीरात इन्शुलिन तयार न झाल्यामुळे ते बाहेरून घ्यावे लागते. (२) इन्शुलिन अनावलंबी मधुमेह. रक्तातील इन्शुलिन किंवा पेशींच्या आवरणावरील संवेदकांची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे ग्लुकोजची पातळी नियंत्रण रहात नाही. हा प्रकार चाळिशीनंतर जास्त दिसतो. स्वादुपिंडातील बीटा पेशी इन्शुलिन नामक संप्रेरक (हार्मोन) तयार करतात; इन्शुलिनरुपी किल्लीने पेशीमध्ये ग्लुकोजचा प्रवेश बंद करणारी कुलपे उघडतात; आणि ग्लुकोज पेशीमध्ये शिरून ऊर्जानिर्मितीचे कार्य करू लागते. पेशीवरील संवेदकाचे कुलूप इन्शुलिनच्या किल्लीने उघडते असे म्हणता येईल. काही गरोदर स्त्रियांना गरोदरपणात साखरेचे प्रमाण वाढल्याने 'जस्टेशनल डायबेटीस' झालेला दिसतो.

त्याशिवाय स्वादुपिंड ग्रंथीच्या काही आजारांमुळे इन्शुलिन तयार करणाऱ्या बीटा पेशींना अपाय होणे, आहारातील प्रथिनांच्या कमतरतेमुळे संतुलित आहार न मिळणे, स्टेरॉइड्चे दीर्घकालीन सेवन करणे - या कारणांनीही मधुमेह होण्याचा संभव असतो.

भारतीयांमध्ये मधुमेहाचे प्रमाण जास्त का याची कारणेही उघड आहेत. भारतीयांमध्ये बैठ्या कामामुळे कमरेच्या वरच्या भागात चरबी साठण्याचे प्रमाण जास्त राहते, त्यामुळे स्थूलपणा वाढत जातो. पाश्चात्यांच्या तुलनेत दहा वर्षे आधीच म्हणजे तिशी-चाळिशीतच भारतीयांवर मधुमेहाचे आक्रमण होते, चांगल्या कोलेस्टेरॉलपेक्षा (एचडीएल) हानिकारक ट्रायग्लिसेराइडसचे प्रमाण भारतीयांच्या लिपिड प्रोफाइलमध्ये जास्त आढळते. मधुमेहामुळे आयुर्मर्यादेत पाच-दहा वर्षांची घट होते; आणि दीर्घकालीन शारीरिक गुंतागुंतीही अधिक जाणवतात. त्यामुळे मधुमेहाला लोक जास्त घाबरतात.

रक्तशर्करेच्या अतिरिक्त प्रमाणामुळे मधुमेह होतो हे खरेच, पण त्याबरोबर झालेली जखम

लौकर बरी न होणे, हातापायांना मुंग्या येणे, पायात गोळे येणे, वजन खूप वाढणे वा अचानक कमी होणे, नजर धूसर होणे, वरचेवर लघवी होणे, खूप तहान व भूक लागणे, लौकर थकवा येणे ही लक्षणेही दिसतात. त्यामुळे वयाची तिशी ओलांडली की प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी मधुमेहासाठी रक्ततपासणी करून घेणे उपयुक्त व आवश्यक ठरते. फक्त लघवीच्या तपासणीने यापासून दूर रहाणे, आनंदी-उत्साही जीवन जगणे यांची गरज असते. आहारात भात, बटाटे, फळे, साखर यांचे प्रमाण काय असावे याचेही विवेचन या पुस्तकात आले आहे. (पृष्ठ ३७), सुकामेवा, अंड्यातील पिवळा बलक, शीतपेये, साय न काढलेले दूध, लोणी-तूप, मिष्टान्ने, तेलकट पदार्थ, मद्य या गोष्टी टाळायला हव्यात. तर अंकुरित पदार्थांचे, हिरव्या पालेभाज्यांचे प्रमाण वाढवावे, भरपूर पाणी प्यावे, पिझ्झा-बर्गर वगैरे फास्ट फूड, जंक फूडही टाळावे, मिठाचे प्रमाण दिवसभरात २ ते ३ ग्रॅमपर्यंत ठेवावे, अशा अनेक सूचनाही देण्यात आल्या आहेत. (५५-५३). रक्तातील चरबीचे मेदघटक (कोलेस्टेरॉल) आणि ट्रायग्लिसेराईडस् यांची माहितीही मधुमेहींना असायला हवी. एचडीएल कोलेस्टेरॉल हे शरीराला उपयुक्त असते. एलडीएल, व्हीएलडीएल हे कोलेस्टेरॉल प्रकार घातकारक असतात.

मधुमेहींनी आपल्याला जखम होऊ नये म्हणून जास्तीत जास्त सावधगिरी बाळगायला हवी. कारण छोटीशी जखम झाली तर ती बरी होणे अवघड ठरते. पायाला जखम झाली तर कधी कधी पाय कापण्याचीही पाळी येते. मोतीबिंदू, काचबिंदू, रेटायनोपेशी वगैरे नेत्रविकार झाले तर अंधत्वही येऊ शकते. लेसर ट्रीटमेंटने सध्या दृष्टी वाचवता येते. रेटिनावर रक्तवाहिन्यांचे पुंजके तयार होऊन कालांतराने त्याचे व्रणात रूपांतर होते व नेत्रपटल सुटून अलग होते. तेव्हा शस्त्रक्रिया करून रेटिना परत जोडणे हाच एकमेव उपाय शिल्लक राहतो. तो अर्थातच खूप खर्चिक असतो.

डॉ. जैन यांनी लहान मुलांमध्ये आढळणाऱ्या मधुमेहाचेही स्वतंत्रपणे विवेचन केले आहे. त्यांच्या पालकांना महत्त्वाच्या मार्गदर्शनपर सूचना केल्या आहेत.

प्रवास करतानाही मधुमेहींनी काळजी घेण्याची गरज असते. प्रवासाच्या वेळी डायबेटिक कार्ड व ओळखपत्र जवळ ठेवावे, साखरेची पुडी, चॉकलेट, फळे इ. बरोबर ठेवावीत. आपण वापरत असलेल्या गोळ्याही पुरेशा प्रमाणात जवळ बाळगाव्या. पाय स्वच्छ ठेवावे, इन्शुलिनची बाटली हँडबॅगेत सहज सापडेल अशी ठेवावी.


मधुमेहाचे नियंत्रण, मासिक तक्ता, दरवर्षी करायच्या तपासण्या, उष्मांकांचा जमाखर्च, सोळाशे कॅलरीज पुरविणारा दैनंदिन आहार, आदर्श दिनचर्या, डायबेटिक कार्ड, व्यायामाचे प्रकार वगैरे १४ परिशिष्टेही उपयुक्त आहेत. जागोजाग आकृत्या व चित्रे देऊन माहितीला दृश्य रूपही शक्य तेथे दिलेले आहे.

मधुमेहाविषयी सर्वांगीण माहिती देणारे हे पुस्तक त्यामुळे सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल.

**पृष्ठे : १९२ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ९० रु. ● पोस्टेज : २० रु.**








# उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी

## मानसशास्त्रीय तसेच चरित्रात्मक समीक्षेचे काही मर्मग्राही नमुने

**अरविंद वामन कुलकर्णी**

डॉ. अरविंद वामन कुलकर्णी हे पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजमध्ये मराठीचे अध्यापन करून निवृत्त झाले. सध्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक म्हणून ते काम करतात. त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या सतरा लेखांचे संकलन 'उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी' या नावाने मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केले आहे. आठ पृष्ठांच्या प्रास्ताविकात त्यांनी उपयोजित समीक्षेच्या संदर्भातील आपली भूमिका मांडली आहे; आणि पुढे मानसशास्त्रीय, कलावादी, चरित्रात्मक वगैरे दृष्टिकोनातून वेगवेगळ्या पुस्तकांवर भाष्ये केली आहेत.

प्रास्ताविकात काही वैशिष्ट्यपूर्ण विधाने डॉ. कुलकर्णी यांनी केलेली आहेत.

१. उपयोजित समीक्षा म्हणजे एखाद्या साहित्यकृतीचे मर्मदर्शन घडवू पाहणारा एखादा झरोकाच होय. त्यात साहित्यविषयक सिद्धांतांची चर्चा येत नाही. पण अशा सिद्धांतांचा आधार उपयोजनेला आवश्यक असतो. मात्र त्या आधारभूत सिद्धांतांचे स्वरूपही साहित्यकृतिगणिक उपयोजकाला बदलून घ्यावे लागते. उपयोजित समीक्षेला काहीतरी पाया कल्पावाच लागतो. तो पटवूनही द्यावा लागतो.

२. साहित्यकृतीच्या आशयाचे नेमके निदान उपयोजकाला करावे लागते.

३. प्रकार एकच असून कादंबरी किंवा नाटक भिन्न आशयाचे प्रवर्तन करू शकते.

४. समीक्षेच्या एकूण व्यवहाराला शुद्ध सैद्धांतिक बैठक लागते, तशीच स्फुट उपयोजित चर्चेचीही गरज असते.

५. मराठीत बरेच उपयोजित समीक्षालेखन झालेले आहे. त्यात भिन्न भिन्न भूमिका आणि पद्धती यांचा वापर झालेला आहे. ते एकसुरी नाही. त्याचा परीघ संतसाहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत विस्तारलेला आहे.

६. वृत्तपत्रे व नियतकालिके ही प्रामुख्याने उपयोजित समीक्षेला स्थान देतात. परंतु त्यात

परिचय, अभिप्राय, धावते परीक्षण अशा जुजबी गोष्टींना महत्त्व दिले जाते; त्यामुळे साहित्यकृतीच्या सौंदर्याचे मर्मग्राही दर्शन घडतेच असे नाही.

७. वाङ्मयीन नियतकालिके मराठीत एकूण कमीच होती/आहेत.

८. उपयोजित समीक्षेद्वारे वाद, संप्रदाय, प्रवाह, प्रकार या अनुषंगाने साहित्यकृतीचे मूल्यमापन, तुलना व मर्मशोध व्हावे अशी अपेक्षा असते.

यात समीक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. भूमिका घट्ट असल्यास साहित्यकृतीवर अन्याय होऊ शकतो. उदा. कलावादी डॉ. सुधीर रसाळ एखाद्या स्त्रीवादी साहित्यकृतीतील जीवनवाद अकलात्मक म्हणून तिची बोळवण करू शकतील. अशा प्रकारचे समीक्षक व साहित्यकृती यामागचे भूमिका-द्वंद्वही वेगळे परिमाण देऊ शकते.

९. उपयोजित समीक्षेच्या बाबतीत समीक्षक, त्याची भूमिका यांना फारसे महत्त्व नसते. साहित्यकृती व तिची मागणी हीच महत्त्वाची बाब असते.

१०. समीक्षकाने आपले आग्रह बाजूला ठेवून साहित्यकृतीच्या मागणीचा वस्तुनिष्ठ विचार करायला हवा.

११. आस्वादक समीक्षा साहित्यकृतीचा आस्वाद हे साध्य समोर ठेवून उपयोजिली जाते. ती सर्वसमावेशक असू शकते.

१२. साहित्यकृतीची संगती लावण्यासाठी लेखकाच्या चरित्राकडे वळणारी चरित्रात्मक पद्धती लेखन ते चरित्र हा मार्ग स्वीकारते.

१३. साहित्यकृतीची निर्मिती व्यक्तिमत्त्वातून होत असली तरी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण समाजच करीत असतो. म्हणून वंश, प्रसारमाध्यमे व युगधर्म या सूत्रांच्या आधारे साहित्यकृतीचा विचार समाजशास्त्रीय पद्धती करते.

१४. कवी म्हणजे बोलका आस्वादक आणि आस्वादक म्हणजे मुका कवी.

१५. कलाव्यवहार म्हणजे जीवननिरपेक्ष अशा सौंदर्यनुभवाची देवाणघेवाण हा सिद्धान्त स्वीकारल्यामुळे केवळ कलामूल्यांच्या आधारे साहित्यकृतीची वा तिच्या लेखकाची विशिष्ट कलात्मक परिघात राहून केलेली शोधयात्रा - या स्वरूपात आस्वादक समीक्षा अवतरते.

१६. आशय आणि अभिव्यक्ती यांच्या अद्वैतातून साहित्यकृतीचे जे रूप सिद्ध होते, त्यात त्या दोहोतील नाते औचित्य, साहचर्य, सहकार्य यांनी परिपूर्ण आहे की नाही हे तपासले जाते.

१७. सामाजिक, धार्मिक, नैतिक, राजकीय कल्पनांशिवाय कलेकडे फक्त कला म्हणून पहावे असे टी. एस. एलियटचे मत होते.

१८. कोलरिजने साहित्यकृतीच्या सेंद्रिय एकसंधत्वाची कल्पना मांडली.

१९. आस्वादात्मक समीक्षेत साहित्यकृतीचा विचार केवळ साहित्यकृती म्हणून करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या समीक्षेत कलाकृतीतील अंतर्बाह्य सुसंगती, प्रमाणबद्धता, घटकरचनेतील औचित्य, उपभोगशून्यता, नावीन्य, सेंद्रिय एकत्व, अनेकार्थता, पदसंदर्भता, विरोधाभासात्मकता



इत्यादी कलामूल्यांचा निकष महत्त्वाचा ठरतो.

२०. भाषा हे मूल्यद्रव्य असलेले साहित्य ही आशयवादी कला होय. जीवनमूल्यांचा विचार त्यामुळे महत्त्वाचा ठरतो. जीवनदर्शनातील सखोलपणा, व्यापकता, उत्कटता, पृथगात्मकता यांना त्यामुळे महत्त्व मिळते. आस्वादक समीक्षेलाही जीवनमूल्यांचा विचार करावाच लागतो.

२१. समीक्षकांच्या आत्माविष्काराला उपयोजित समीक्षा चांगला वाव देते. सैद्धांतिक चर्चेत असा फारसा वाव नसतो.

प्रा. कुलकर्णी यांनी उपयोजित समीक्षेसाठी निवडलेल्या साहित्यकृती या समीक्षा, नाटक, कादंबरी, लघुकथा, ललित निबंध, आत्मचरित्र व काव्य या प्रकारातील आहेत.

'शांतता, कार्ट चालू आहे' या नाटकाचे मानसशास्त्रीय अवलोकन करताना फ्राईडच्या सिद्धांतांचा आधार अपरिहार्यच! 'नेणिवेच्या गुहेतील अज्ञात स्पंदनांनी जागृत मनाचे ढिले पहारे चुकवून वर येऊन कार्यप्रवण होण्याची प्रक्रिया या नाट्यकृतीत दिसते.

नाटकाच्या केंद्रस्थानी असणारी बेणारे ही व्यक्तिरेखा कामगंडाचे प्रतीक आहे. पुरुष सहवासाची तिची ओढ, सामंतबद्दलचे आकर्षण, दडपलेली कामेच्छा, माझा पुरुष शेपूट घालून पळाला यासारख्या तिच्या प्रतिक्रिया ही मादीच्या अपमानित लैंगिक असमाधानाची द्योतक आहे. सौ. काशीकर हे देखील अतृप्त कामेच्छेचेच एक मादीरूप आहे. पण बेणारेपेक्षा वेगळ्या प्रकारचे. ती अपत्यहीन आहे. तिचे दर्शनी वात्सल्य अतृप्त कामेच्छेपोटीच जाणवते. नेणिवेतून संभवलेल्या मानसिक गंडाचे व सहजप्रेरणावृत्तीचे दर्शन घडवणारे हे नाटक शेवटीही नेणिवेच्या पातळीवरच झेपावते. नेणिवेतील गंडादींचा सुसंगत मेळ घालण्याचा हा प्रयत्न कलात्मक म्हणता येईल. असे सांगून प्रा. कुलकर्णी म्हणतात, ''कलाकृती म्हणून या नाटकाचा दर्जा काय या प्रश्नाचे नेमके उत्तर या समीक्षपद्धतीजवळ नाही.'' (२१)

इगो आणि लिबिडो म्हणजे अहम् आणि रतिशक्ती या दोहोंवरच गडकऱ्यांच्या व्यक्तिरेखा आधारलेल्या दिसतात असे कुलकर्णी यांचे मत आहे. (२२) तळीराम हा न्यूनगंडाचा बळी आहे. म्हणून तो मद्यपान करतो. उपद्रवकारक वागतो. जयंत-लीला ही परस्परानुरक्त, परस्परांच्या कामेच्छेचे शमन करण्याची इच्छा व शक्ती त्यांच्यात आहे. पण सामाजिक चौकटीमुळे आणि इगोमुळे त्यांना त्यात यश न आल्याने त्यांजवर आत्मघाताची पाळी येते. सुधाकरचा अहम्ही न्यूनत्वाच्या, परावलंबनाच्या विळख्यात अडकलेला आहे. (२५) झोंबीची खरी ताकद तिच्यातील विचारप्रवर्तनात आणि अंतर्मुख करणाऱ्या जीवनदर्शनात आहे, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इ. भूमिकेतून झोंबीचा अभ्यास व्हावा असे कुलकर्णी सुचवतात.

प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या 'राक्षसविवाह' या कादंबरीवरील त्यांचे भाष्य अंतर्भेदक आहे. विचारव्यूह उभा करताना काम झाकायचे आणि काय दाखवायचे या संभ्रमात लेखक सापडल्यागत झालेला असावा. (४१) 'यमूबद्दलचे प्रेम कामुक-शरीर-लैंगिक नव्हते असे एकीकडे म्हणणे आणि दुसऱ्याच्या ताब्यात तिचे शरीर गेले म्हणजे गढूळ झाले म्हणून

हळहळत दु:खी होणे- ह्या नायकाच्या मानसिक आंदोलनातला गोंधळ मनोविश्लेषणाच्या आधारे स्पष्ट करता येईल. पण शेवट पूर्णपणे नेणिव-नियंत्रित आहे असे कुलकर्णींना वाटते. १९४० मधील ही कादंबरी नवसाहित्याची नवी परिमाणे रुढ होण्याआधी मनोविश्लेषणात्मक भावकथा यासारखी संज्ञा वापरते - हे एक आश्चर्यच्! (नवकथाकारांना नावे ठेवणारे श्रीकेक्षी हे तसे पाहिले तर आद्य नवकथाकार होते, असे म्हणायला हवे.)

गो. नी. दांडेकर यांच्या कुणा एकाची भ्रमणगाथा या कादंबरीचा व स्मरणगाथा या आत्मचरित्राचा काही प्रसंगांच्या अनुरोधाने मेळ घालण्याचा आणि कादंबरीच्या आशयाचा संबंध लेखकाच्या चरित्राशी आहे हे त्यातून सिद्ध होत असल्याचा अभिप्राय व आनंद डॉ. कुलकर्णी व्यक्त करतात. सावित्री (पु. शि. रेगे) या कादंबरीचे श्रेष्ठत्व कनिष्ठत्व मानसशास्त्रीय मीमांसाद्वारे स्पष्ट करता येत नसले तरी सावित्रीच्या आतंरिक गुंतागुंतीचा उलगडा तिच्यामुळे होऊ शकतो, असे त्यांना जाणवते. (५९)

अरुण साधू यांची शापित ही कादंबरी हतबल करणाऱ्या अनाकलनीय भव्यतेचा अनुभव देत नाही. तिच्यातील कथाव्यूह एकेरी व साधारण आहे. (६८)

श्यामिनी (तारा वनारसे) ही कादंबरी व्यक्तिश: आणि समूहश: एका व्यापक कारुण्याचा अनुभव देते. (७९)

'चानी' (चिं. त्र्यं. खानोलकर) ची बांधणी परंपरागत आहे. परंतु सूक्ष्म व प्रभावी कथासूत्र, सामाजिक, अंधश्रद्धाळू जाणिवांचे अंत:सूत्र, प्रतीकात्मकतेची अकृत्रिम परिमाणे लाभलेली चित्रमयी जिवंत भाषा, या सर्वांना एकसंध करणारी समर्थ कलादृष्टी यामुळे ही कादंबरी चैतन्यपूर्ण झाली आहे. (८६)

सुनीता देशपांडे यांच्या 'आहे मनोहर तरी' चे मूल्यांकन करताना डॉ. कुलकर्णी म्हणतात, ''यात दोन आत्मनिवेदने आहेत. जाणिवेच्या पातळीवरील आहे मनोहर तरी, आणि नेणिवेच्या पातळीवरील गमते उदास! लेखिकेच्या प्रामाणिक, निर्बंधकरहित आणि खऱ्याखुऱ्या आत्मशोधक भूमिकेमुळे दोन्हीही सजीव झालेली आहे.'' (११४)

विंदा करंदीकर यांच्या गझलांना गझल म्हणणे कठीण आहे, त्या कविताच आहेत. (१२०) केशवकुमारांच्या विडंबनातही मूळ विडंबनविषयाचा अल्प आधार या त्यांच्या वैशिष्टामुळे मूळ ठाऊक नसले तरी झेंडूची फुले मधील विडंबने आजही आस्वाद्य वाटतात. (१२७) ही मतेही विचारांना चालना देणारी आहेत.

मानसशास्त्राचा आधार घेत आणि चरित्र-साहित्य-वाङ्मयप्रकार यांची सांगड घालत डॉ. कुलकर्णी यांनी विविध साहित्यकृतींवर केलेले हे आस्वादक भाष्य त्या त्या कलाकृतीच्या भावविश्वात वाचकाला गुंतवून टाकते.

**पृष्ठे : १४४ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ९० रु. ● पोस्टेज : २० रु.**



# पुरस्कार

## ❒ मराठवाडा साहित्य परिषदेचे पुरस्कार

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने दर वर्षी वाङ्मयीन पुरस्कार दिले जातात. २००२ या वर्षाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. मराठीतील इतिहास, संस्कृती, कला आणि वाङ्मय यांची मीमांसा करणाऱ्या सर्वोत्कृष्ट ग्रंथाला दिल्या जाणाऱ्या 'नरेंद्र मोहरीर' पुरस्कारासाठी पंढरपूरच्या डॉ. द. ता. भोसले यांच्या 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' या ग्रंथाची निवड करण्यात आली आहे. या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद मॅकमिलन कंपनी आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान प्रसिद्ध करीत आहे.

मराठीतील समीक्षा व वैचारिक वाङ्मय क्षेत्रातील उत्कृष्ट ग्रंथाला दिला जाणारा 'प्राचार्य म. भी. चिटणीस' पुरस्कार डॉ. दादा गोरे यांच्या 'साहित्यरूप' या पुस्तकाला देण्यात आला आहे. मराठवाड्यातील लेखकाच्या सर्वोत्कृष्ट ललित कृतीस व समीक्षा ग्रंथाला दिला जाणारा 'नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार' ललिता गादगे यांच्या 'प्राजक्ताची फुले आणि दाह' या कथासंग्रहास दिला आहे. उत्कृष्ट काव्यसंग्रहाला दिल्या जाणाऱ्या 'कुसुमावती देशमुख' काव्य पुरस्कारासाठी तुळसी परब यांच्या 'कुबडा नार्सिसस' या काव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांपैकी 'चिटणीस', 'कुरुंदकर' आणि 'देशमुख' हे पुरस्कार एक हजार रुपयांचे आहे, तर 'मोहरीर' पुरस्कार पाच हजार रुपयांचा आहे.

## ❒ 'समाज घटकांशी संवादाने अंधश्रद्धा निर्मूलन शक्य'

''समाजातील अंधश्रद्धा घालविण्याची भाषा करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी बुवा, महाराजांचे सत्कार थांबवून समाजातील घटकांशी थेट संवाद साधणे आवश्यक आहे,'' असे 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती'चे (अंनिस) कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सांगितले.

समाजसुधारणेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस येथील आवाबेन नवरचना केंद्र व संस्थेतर्फे 'सुमतीबाई साठे' पुरस्कार देण्यात येतो. संस्थेच्या तिसाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून यंदा डॉ. दाभोळकर यांना ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. राम ताकवले यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. दोन हजार रुपये आणि मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

ते म्हणाले, ''हा पुरस्कार देऊन संस्थेने माझ्यावरील वाढीव जबाबदारीची जाण करून दिली आहे. मला मिळालेला पुरस्कार निरपेक्षपणे 'अंनिस' चे कार्य करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांचा गौरव आहे. त्याच भावनेने पुरस्कारातून मिळालेली रक्कम मी 'आवाबेन' संस्थेलाच देत आहे.

'भाऊसाहेब रानडे पुरस्कार' रवींद्र लांजेकर यांना 'दहावी फ' चित्रपटाच्या दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांच्या हस्ते देण्यात आला. प्रा. ताकवले यांनी, 'माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन साधण्यासाठी समाजसेवी संस्थांनी प्रयत्न केला पाहिजे,' असे मत व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाल शाह, कार्याध्यक्ष माई केदारी, विश्वस्त अनुताई लिमये, पुष्पाताई मायदेव, केंद्राच्या चिटणीस डॉ. सुलभा शाह आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला केंद्रातील विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धाविषयक नाटिका सादर केली. श्रीमती केदारी यांनी रचलेल्या महिला चळवळ गीतांच्या 'स्त्री जागर' पुस्तिकेचे श्रीमती भावे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### ❒ 'मृण्मयी' पुरस्कार

''मृण्मयी पुरस्काराच्या रूपाने गोनीदांनी त्यांच्या पाठीवरची शाल माझ्या पाठीवर ठेवली आहे. हा पुरस्कार मला पुढील लेखनासाठी प्रेरणा देत राहील,'' अशी भावना लेखक आनंद अंतरकर यांनी व्यक्त केली. अंतरकर यांच्या 'रत्नकीळ' या व्यक्तिचित्रणात्मक लेखसंग्रहाला ज्येष्ठ कवी शंकर वैद्य यांच्या हस्ते 'मृण्मयी' पुरस्कार देण्यात आला. 'मोगरा फुलला' या कादंबरीच्या अभिवाचनातून ध्वनिफितीचे प्रकाशन श्री. चैतन्यमहाराज देगलूरकर यांच्या हस्ते झाले.

श्री. अंतरकर म्हणाले, ''वडिलांमुळे मला साहित्यविषयी प्रेम वाटायला लागले, त्यांच्या हाताखाली 'हंस' च्या कार्यालयात काम केले. माझ्यासाठी ते विद्यापीठच होते. निरनिराळ्या साहित्यिकांचे साहित्य तेथे वाचायला मिळाले आणि त्या प्ररणेने लिहायला सुरुवात केली. प्रथम निजानंदासाठी लिहीत होतो. मात्र, लिहिता लिहिता त्यांचे परमानंदात रूपांतर झाले. 'मृण्मयी' ही माझी सर्वांत आवडती कादंबरी आहे. याच नावाने आज पुरस्कार मिळतो आहे, ही मी आनंदाची बाब समजतो.''

श्री. शंकर वैद्य म्हणाले, ''गोनीदांच्या लेखनात मराठी भाषेची वेगवेगळी रुपे पाहायला मिळतात. कोकणी ढंगात, वऱ्हाडी ढंगात, पश्चिम महाराष्ट्रातील भाषेच्या बाजात त्यांनी सहज लिहिले आहे. त्यांची भाषा ही नवनिर्मिती आहे. हे फक्त प्रतिभावंतच करू शकतो. गोनीदांनी आयुष्यात अनेक दु:ख झेलली. पण त्यांची प्रतिभा ही या दु:खावर मात करणारी आहे. त्यांची लेखणी 'गोपाळा'ची बासरी झाली. ते फक्त हळवे नव्हते. प्रसंगी त्यांच्या साहित्यात कठोरपणाही दिसतो.'' श्री. देगलूरकर म्हणाले, ''अप्पांचे जीवन ज्ञानोबांशी एकरूप झाले होते. ज्ञानोबा जसे समानानुभूतीच्या पातळीवर जगत असत. अप्पाही आपल्या कादंबऱ्यांमध्ये एखाद्या व्यक्तिरेखेशी एकरूप होत असत. त्यामध्येही सहानुभूतीपेक्षा समानानुभूतीचा भाग असे. त्यामुळे ती व्यक्तिरेखा ते स्वत: जगत.''

श्रीमती वीणा देव यांनी 'रत्नकीळ' कादंबरीला पुरस्कार देण्यामागची भूमिका स्पष्ट केली. मृणाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मधुरा डहाणूकर यांनी आभार मानले.

### ❒ आचार्य अत्रे पुरस्कार

'आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार' उपराकार लक्ष्मण माने यांना, 'पत्रकार पुरस्कार' केसरीचे सहसंपादक संजय दिनकर कुलकर्णी यांना आणि 'कलावंत पुरस्कार' नाट्य-चित्रपट अभिनेते राहुल सोलापूरकर यांना जाहीर करण्यात आला.

सासवडच्या आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या वतीने दर वर्षी अत्रे यांच्या जन्मदिनी हे



पुरस्कार वितरित केले जातात. या पुरस्कारांचे यंदाचे हे चौदावे वर्ष असून तेरा ऑगस्टला अत्रेंच्या १०५ व्या जयंतीदिनी कऱ्हेकाठी सासवडला पुरस्कार वितरण सोहळा होईल, असे अत्रे प्रतिष्ठानचे सचिव विजय कोलते यांनी सांगितले. लक्ष्मण माने हे वेगळ्या वळणाच्या सामाजिक कामातील अनुभवी लेखक आहेत. संजय कुलकर्णी दैनिक 'केसरी'च्या पुणे आवृत्तीचे सहसंपादक आहेत. यापूर्वी साहित्यिक राम शेवाळकर, माधव गडकरी, ब. मो. पुरंदरे, शांता शेळके, प्रा. व. बा. बोधे, अरुणा ढेरे, अप्पासाहेब खोत, पत्रकार सुधीर भोंगळे, अरुण खोरे, महादेव कुलकर्णी, यशवंत पाध्ये, अरविंद गोखले, राजीव साबडे, श्रीकृष्ण नेवसे, मल्हार अरणकल्ले, सुधीर गाडगीळ आणि कलावंत म्हणून राजा गोसावी, भारूडकार डॉ. रामचंद्र देखणे, प्रभाकर पणशीकर आदी या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

### ❒ आशा राशिंगकर यांना पीएच्. डी.

आशा सुधीर राशिंगकर यांना पुणे विद्यापीठाची मराठी विषयातील पीएच्. डी. जाहीर झाली आहे. 'मराठीतील रामदासविषयक वाङ्मयाचे समालोचन' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. नामदेव अध्यासनाचे डॉ. अशोक कामत यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

### ❒ कन्नड अभ्यास वर्ग परीक्षेत अनुराधा कुलकर्णी प्रथम

'मराठी कन्नड स्नेहवर्धन केंद्रा'तर्फे घेण्यात आलेल्या कन्नड अभ्यास वर्ग परीक्षेत श्रीमती अनुराधा कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. श्रीमती उत्तरा पंडित द्वितीय तर मेधा देऊळकर यांना तृतीय क्रमांक मिळाला.

### ❒ शशिकला कांबळे यांना पुणे विद्यापीठाची पीएच्. डी.

स. प. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. शशिकला कांबळे यांना पुणे विद्यापीठाने पीएच्. डी. पदवी प्रदान केली आहे. 'श्याम मनोहर यांचे साहित्य : एक चिकित्सक अभ्यास' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. डॉ. मृणालिनी शहा यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

### ❒ भावना गायगोरे यांना पीएच्. डी.

'मराठी लोकगीतांतून व्यक्त होणाऱ्या स्त्री-जीवनाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील संशोधनासाठी नागपूर विद्यापीठाने भावना गायगोरे यांना नुकतीच पीएच्. डी. प्रदान केली.

या संशोधनासाठी वामनराव चोरघडे व शांता शेळके यांचे मार्गदर्शन मिळाले. श्रीमती गायगोरे या सध्या नागपूर येथील नूतन भारत कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथपालपदी कार्यरत आहेत.

### ❒ वीणादेवी सातपुते यांना 'वुमन ऑफ द इयर' पुरस्कार

डॉ. वीणादेवी सातपुते, पुणे यांना गुवाहाटी येथे झालेल्या 'एशियन ॲस्ट्रॉलॉजर्स काँग्रेस' च्या सहाव्या अधिवेशनात उत्कृष्ट शोधनिबंध सादर केल्याबद्दल 'द वुमन ऑफ द इयर' या पुरस्काराने गौरवण्यात आले. सोनेरी मुकुट व पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 'भारतीय फलज्योतिष्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. ''भारतीय परंपरा व रुढी या वैज्ञानिक पायावर उभारलेल्या आहेत. त्याच्या साकल्याने विचार व्हावा.

पूर्वजांनी निर्माण केलेल्या परंपरांचा सखोल अभ्यास व्हावा. अंधश्रद्धा म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नये.'' असे त्यांनी सांगितले.

### ❐ डॉ. तगारे यांना आचार्य हेमचंद्र पुरस्कार प्रदान

दिल्ली येथील जसवंत धर्मार्थ ट्रस्ट व भोगीलाल लहेरचंद भारतीय संस्कृती संस्थान यांच्यातर्फे देण्यात येणारा 'कलिकालसर्वज्ञ आचार्य हेमचंद्र पुरस्कार' सांगली येथील संस्कृत व प्राकृत भाषातज्ज्ञ डॉ. ग. वा. तगारे यांना प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ. नामवर सिंह यांच्या हस्ते दिल्ली येथे देण्यात आला. ५१ हजार रुपये, आचार्य हेमचंद्रांची सुवर्ण प्रतिमा व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. तगारे संस्कृत, पाली, प्राकृत भाषा, पुराणे, जैन धर्म व शैवमत या विषयांचे व्यासंगी असून त्यांनी अनेक पुराणांचे इंग्रजी भाषांतर केले आहे.

### ❐ अय्यंगार व डॉ. देवबागकर यांना 'विद्या व्यास पुरस्कार'

विद्या सहकारी बँकेचा 'विद्या व्यास पुरस्कार' यंदा योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार व पुणे विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दिलीप देवबागकर यांना जाहीर झाला आहे.

विविध क्षेत्रात गुरुतुल्य कार्य करणाऱ्या दोघांना बँकेतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. ज्येष्ठ शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, तर तरुण शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यंदाचा ज्येष्ठ शिक्षकासाठीचा पुरस्कार योगाचार्य अय्यंगार यांना देण्यात येणार आहे. तीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे. तरुण शिक्षकासाठीच्या पुरस्कारासाठी डॉ. देवबागकर यांची निवड झाली असून, वीस हजार रुपये, मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे.

योगाचार्यांनी जगातील २५ देशांमध्ये योगाभ्यासाचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी योगाभ्यासाचा सराव व संशोधन करून त्याद्वारे विविध व्याधी व आजारांनी त्रस्त असलेल्यांना बरे केले आहे. त्यांच्या जीवनावर आधारित 'समाधी' या चित्राफितीस 'सिल्व्हर लोटस' पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांना पद्मश्री व पद्‌भूषण हे सन्मान मिळाले आहेत.

डॉ. देवबागकर १९९९ पासून पुणे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. 'रेण्वीय जीवशास्त्र' या विषयातील त्यांच्या संशोधनास आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत १२ विद्यार्थ्यांनी पीएच्. डी. मिळविली आहे. प्राणिशास्त्राशी संबंधित राष्ट्रीय पातळीवरील विविध संस्थांचे पदाधिकारी व आजीव सदस्य म्हणून ते काम करीत आहेत.



# श्रद्धांजली

### ❐ स्नेहलता दसनूरकर

प्रसिद्ध कथालेखिका स्नेहलता दसनूरकर (वय ८५) यांचे दि. २ जुलै रोजी सकाळी वृद्धापकाळाने चेंबूर येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या मागे शेखर व दिलीप हे दोन मुलगे, अरुणा व प्रिया या दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

मूळच्या कोल्हापूरच्या असलेल्या दसनूरकर यांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर गारगोटी (जि. कोल्हापूर) येथे अध्यापन केले. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या. 'शापित' या त्यांच्या कादंबरीवरून चित्रपट काढण्यात आला व त्याला अनेक पुरस्कार मिळाले. सध्या अल्फा टीव्हीवर लोकप्रिय असलेल्या 'अवंतिका' या मालिकेचे लेखन स्नेहलता दसनूरकर यांनी केले होते.

### ❐ पुष्पा मेढेकर

प्रसिद्ध लेखिका पुष्पा मेढेकर (वय ६६) यांचे नुकतेच दीर्घ आजाराने ठाणे, मुंबई येथील त्यांच्या घरी निधन झाले. 'ज्योतिर्मयी' ही गाजलेली कादंबरी; तसेच 'चांद्रस्वार', 'खारे पाणी गोडे पाणी', 'अमेरिकन जॉर्जेट', 'आभाळ पक्षिणीचे' या पुस्तकांबरोबरच किशोरांसाठीही त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. 'दहिंवर' हा त्यांचा काव्यसंग्रहही यापूर्वीच प्रकाशित झाला आहे.

नागपूर विद्यापीठाच्या परकीय भाषा व भाषाशास्त्र विभागात जर्मन भाषेच्या, तर अमरावती येथील बियाणी महाविद्यालयातही मराठीच्या प्राध्यापिका म्हणून त्यांनी काम पाहिले.

### ❐ सुहास शिरवळकर

लोकप्रिय लेखक व रहस्यकथाकार सुहास शिरवळकर (वय ५४) यांचे दि. ११ जुलै रोजी मुंबईत हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी व दोन मुलगे असा परिवार आहे.

श्री. शिरवळकर यांच्या मोठ्या भगिनी निर्मला सावंत यांचे पंधरा दिवसांपूर्वीच निधन झाले होते. त्यासाठीच ते मुंबईला गेले होते. भाचीकडे असताना छातीत दुखू लागले. म्हणून त्यांना लगेचच रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र त्याचा उपयोग झाला नाही. हृदयविकाराचा

झटका तीव्र असल्याने उपचारांपूर्वीच दुपारी सव्वाबाराच्या सुमारास त्यांचे निधन झाले.

सुहास शिरवळकर या नावाचे 'सु. शि.' हे लघुरूप महाविद्यालयीन तरुणांमध्ये लोकप्रिय आहे. त्यांनी काही काळ याच नावाने व बॅरिस्टर अमर विश्वास या नावानेही लेखन केले. वाणिज्य शाखेची पदवी मिळाल्यानंतर शिरवळकर टिटवाळ्याला शिक्षक म्हणून काम करू लागले. त्याचवेळी ते रहस्यकथा लिहायला लागले. वडील रामचंद्रबुवा यांना कीर्तनात साथ द्यायला ते जात असत. या कीर्तनांमुळे त्यांच्या लेखणीवर साध्यासोपेपणाचे संस्कार झाल्याचे ते मानत. आपले वडीलबंधू उत्तम शिरवळकर यांच्याप्रमाणे आपण लिहावे, असे वाटून त्यांनी लेखनाला प्रारंभ केला. रहस्यकथाकार गुरुनाथ नाईक यांच्यामुळे या लेखनाकडे वळलेल्या शिरवळकरांनी 'बॅरिस्टर अमर विश्वास', 'फिरोज इराणी', 'दारा बुलंद', 'मंदार' या नायकांना जन्म दिला.

रहस्यकथांची मागणी ओसरण्यापूर्वीच शिरवळकर सामाजिक कादंबरीकडे वळले. तोवर ३३ रहस्यकथा लिहून झाल्या होत्या. 'दुनियादारी' या कादंबरीमुळे त्यांना एकदम लोकप्रियता मिळाली. पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा कट्टा व पुण्यातील कट्टा संस्कृती या कादंबरीत चित्रित झाली होती. हीच कादंबरी सध्या मालिकारुपाने पुन्हा घरात पोचली आहे. 'पहाटवारा', 'झूम', 'मधुचंद्र', 'हमखास', 'जाता-येता', 'क्षितिज', 'कल्पांत', 'कळप' इ. यासारख्या त्यांच्या ७१ कादंबऱ्यांना व ११ कथासंग्रहांना सतत मागणी असते. 'मर्मबंध' संग्रहातील कथेवर 'देवकी' हा चित्रपट निघाला. 'देवाघरची फुले', 'शमन', 'अंधारभूल' या लोकप्रिय कथांचे कथन करणारी 'अंधारभूल' ही ध्वनिफीत प्रकाशित झाली. हा सारा लेखाजोखा मांडणारे 'फलश्रुती' हे पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. सध्याही ते दोन हिंदी चित्रपटांसाठी काम करीत होते.

## ❒ सुभाष मुखोपाध्याय

'ज्ञानपीठ' विजेते ज्येष्ठ बंगाली साहित्यिक सुभाष मुखोपाध्याय (वव ८२) यांचे ८ जुलै रोजी निधन झाले. मुखोपाध्याय गेले काही दिवस आजारी होते. कलकत्ता येथील एका रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य व राज्यातील साहित्यिकांनी मुखोपाध्याय यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले.

मुखोपाध्याय यांचा जन्म १२ फेब्रुवारी १९१९ रोजी तत्कालीन बंगाल प्रांतातील कृष्णनगरला झाला. कोलकत्ता विद्यापीठातून ते बी. ए. झाले. १९४० पासून काव्यलेखनाने त्यांनी कारकिर्दीची वाटचाल सुरू केली. काव्य, कादंबरी, प्रवासवर्णन, बालसाहित्य, अनुवाद असे साहित्य प्रकार कौशल्याने हाताळणाऱ्या मुखोपाध्याय यांच्या सुमारे पन्नास साहित्यकृती प्रसिद्ध झाल्या आहेत.

आपल्या कविता किंवा साहित्यात तळागाळातल्या माणसांच्या व्यथांनाच मुखोपाध्याय यांनी सातत्याने स्थान दिले आहे. मुखोपाध्याय यांना अनेक मानसन्मानही लाभले आहेत. १९५३ मध्ये त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. १९७७ मध्ये 'आफ्रो-आशियन लोटस' पुरस्कारही मिळाला होता. १९९३ मध्ये त्यांना 'ज्ञानपीठ' ने सन्मानित करण्यात आले, तर त्याच वर्षी विश्वभारती विद्यापीठाने 'देशिकोत्तम' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.



त्याशिवाय केंद्र सरकारने 'पद्मभूषण' किताबाने त्यांना सन्मानित केले आहे.

सातारा येथील ६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळचे त्यांचे भाषण खूपच प्रभावी ठरले होते.

उत्तुंग परंपरा असलेल्या बंगाली साहित्याला सुभाष मुखोपाध्याय तब्बल साठ वर्षांहून अधिक काळ आणखी समृद्ध करीत राहिले. वैचारिक लेखन, कादंबरी, प्रवासवर्णन, बालसाहित्य अशा विविध प्रकारांतून ते बंगाली वाचकांना भेटत राहिले आणि साहित्यक्षेत्रातील एकाहून एक मोठे सन्मान मिळवीत गेले. साहित्य अकादमी, आफ्रो-एशियन लोटस, विश्वभारतीचा देशिकोत्तम या सर्व पुरस्कारांनी त्यांना बंगाली भाषेतीलच नाही तर भारतातील अग्रगण्य साहित्यिकांच्या नामावलीत नेले. ते ज्ञानपीठ पुरस्काराचे चौथे बंगाली विजेते ठरले. त्यांचे सर्व साहित्य विशिष्ट विचारसरणीपेक्षा मानवी मूल्यांचा विचार करणारे, मानवी जीवनाला नवी दिशा आणि नवे संस्कार देणारे होते. त्यांचे सर्वच साहित्य गाजले तरी मूळ पिंड कवीचा होता. बंगालमधील जवळजवळ प्रत्येक चिंतनशील तरुणाला कम्युनिस्ट क्रांतीच्या विचारांने भारावून टाकले होते. त्या काळातच या कवीचा साहित्यप्रवास सुरू झाला. साहजिकच प्रारंभी ते केवळ क्रांतीवरच काव्य करीत.

पण खरा कवी हा सर्वार्थाने मुक्त असतो हे सुभाष मुखोपाध्याय यांच्या जीवनपटावरून स्पष्ट होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्डहोल्डर असूनही त्यांनी इतर सहकाऱ्यांप्रमाणे पोथीनिष्ठा बाळगली नाही. कम्युनिस्टांची वाटचाल लोकशाहीच्या म्हणजेच मानवी मूल्यांच्या विरोधात चालली असल्याचे पाहिल्यावर ते अस्वस्थ झाले. त्यामुळे कम्युनिस्टांचा रोष त्यांनी ओढवून घेतला पण बंगाली कवितेला क्रांतिकारी वळण देण्याचे अद्‌भूत काम मुखोपाध्यायांनी केले. बंगालीतील बोली भाषा कवितांमध्ये वापरण्याचा प्रयोग त्यांनी प्रथम केला. त्यामुळे सर्वसामान्यांनाही त्यांची कविता जवळची वाटू लागली. त्यांनी नंतरच्या कवितात सांकेतिक कविकल्पना आणि प्रतिके टाळली. ८२ वर्षांचे समृद्ध जीवन व्यतीत करून सुभाष मुखोपाध्याय काळाच्या पडद्याआड गेले. पण चरकूट, भाल मधुमास, आमार बांगला, हुंगरूस, जत दुरेई जाई, पदानिक अशा एकाहून एक सरस साहित्यकृतींनी ते रसिकांच्या मनात अढळ स्थान मिळवून आहेत.

## ❒ डॉ. पां. ना. कुलकर्णी

दि. ३० जून रोजी कोल्हापूर येथे संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. पांडुरंग नारायण कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, तीन मुलगे व एक मुलगी असा परिवार आहे.

प्राचीन मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक प्रा. पां. ना. कुलकर्णी यांच्या निधनाने संशोधकांचा मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेला आहे. केवळ कोल्हापूर पंचक्रोशीतच नव्हे, तर जिथे मराठी माणूस आहे, तिथे पां. ना. कुलकर्णींचा ठसा पोचला आहे. एके काळीचे 'राजाराम'चे मराठीचे प्राध्यापक, उत्तम वक्ते, निवृत्तीनंतरचे संशोधक अशा त्यांच्या प्रतिमांनी पां. ना. विषयी एक नैतिक दबदबा वाटत असे. विद्यार्थी-विद्यार्थिनींची त्यांच्यावर विशेष भक्ती

होती. शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात आणि आजही नागपूर, धारवाडपर्यंत पां. नां. चा चाहता वर्ग आहे. ज्ञानेश्वरीची एकनाथपूर्वकालीन प्रत शिवाजी विद्यापीठाने काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केली. त्यावेळीही पां. नां. चा उत्साह, विद्वत्ता व संशोधक वृत्ती करवीरकरांनी अनुभवली.

अप्पासाहेब फडके, अप्पासाहेब पवार, द. सी. पंगू असे शिक्षक पां. ना. ना लाभले. फडके-खांडेकर यांचा वाङ्मयीन संघर्ष घडला त्याच काळात पां. ना. चीही वाङ्मयीन जडणघडण सुरू होती. शिक्षक या नात्याने त्यांचा विद्यार्थ्यांशी कसा संपर्क असे याच्या आठवणी डॉ. वसंतराव जोशींसारखे संशोधक अजून सांगतात. त्यांच्या वक्तृत्वात सूक्ष्म व मर्मग्राही दृष्टीने दर्शन घडत असे. शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर काम करताना त्यांनी अनेकदा सभागृह गाजविले. फडके-खांडेकरांच्या जन्मशताब्दीच्या वेळीही विविध व्यासपीठावरून अत्यंत प्रगल्भपणे पां. ना. नी आपली निरीक्षणे मांडली. कोल्हापूर जिल्ह्यात कुरुंदवाडजवळ असणाऱ्या तेरवाडला मुक्तेश्वराचे मंदिर व समाधी आहे. पां. ना. कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन मुक्तेश्वर प्रतिष्ठान स्थापन केले. नामवंत कवी आणि पां. ना. चे चिरंजीव डॉ. दिलीप कुलकर्णी आणि त्यांच्या पत्नीने हे प्रतिष्ठान चालविले आहे. करवीर नगर वाचन मंदिर किंवा केशवराव भोसलेमध्ये श्रोता म्हणून पां. ना. आवर्जून उपस्थित असत. त्यांच्या निधनाने एक उत्तम शिक्षक व जाणता अभ्यासक गेला.

### ❐ रा. सो. सराफ

इंग्रजी भाषेचे ज्येष्ठ तज्ज्ञ आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निमिर्ती मंडळाचे माजी संचालक डॉ. रामचंद्र सोनुपंत उर्फ रा. सो. सराफ (वय ७७) यांचे ता. ५ जुलै रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगी, जावई आणि नातवंडे आहेत.

इंग्रजी भाषेचे शिक्षण, अध्यापन आणि संज्ञापन या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेले डॉ. सराफ यांनी विपुल लेखनही केले आहे. कादंबरी, कविता, अनुवाद हे विविध साहित्यप्रकारही त्यांनी हाताळले. इंग्रजी शिक्षणाबाबतची त्यांची पुस्तके उल्लेखनीय ठरली. राज्याच्या शिक्षण विभागात विविध पदांवर त्यांनी काम केले. निवृत्तीनंतरही ते सक्रिय होते.

डॉ. सराफ यांचा जन्म २३ जुलै १९२६ चा. ते मूळचे अकोला जिल्ह्यातील लाडाचे कारंजे येथील. इंग्रजी आणि उपयोजित मानसशास्त्र विषयांत त्यांनी एम. ए. ही पदवी मिळविली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून त्यांनी पीएच. डी. पदवी मिळविली. हैदराबाद येथील 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेजेस' आणि मँचेस्टर विद्यापीठे येथे त्यांनी 'परभाषा म्हणून इंग्रजीचे अध्यापन' या विषयावर विशेष प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी इंग्रजी भाषेच्या अध्यापन क्षेत्रात अनेक पदे भूषविली.

महाराष्ट्र राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्थेचे ते पहिले भारतीय संचालक होते. बृहन्मुंबई महापालिकेच्या 'भाषा विकास प्रकल्पा'चे ते प्रमुख होते. नंतर ते राज्यशासनात उपसचिव झाले. १९७९ ते १९८४ या काळात ते पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे (बालभारती) ते संचालक होते. या काळात त्यांनी अनेक नवीन उपक्रम राबविले. महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे



संचालक म्हणून १९८५ मध्ये निवृत्त झाले. 'बालभारती'च्या इंग्रजी विषय समितीचे ते अध्यक्ष होते. आशियाई देशांतील इंग्रजी भाषा अध्यापनाबाबत टोकियो येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे ते उपाध्यक्ष होते. 'संज्ञापन कौशल्य' या विषयावर त्यांचे प्रभुत्व होते.

'इंग्रजी भाषेचे अध्यापन' या विषयावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'इंग्लिश इन महाराष्ट्र', 'टीचिंग इंग्लिश इन इंडिया', 'इंग्लिश लँग्वेज एक्सरसाईज', 'इंग्रजी कसे शिकवावे?', 'इंग्लिश लँग्वेज फॉर एसएससी स्टुडंटस', 'लर्निंग इंग्लिश ग्रामर', 'मास्टर की टू एसएससी इंग्लिश', 'परभाषा म्हणून इंग्रजीचे अध्यापन', 'न्यू मिलेनियम डिक्शनरी' आदींचा त्यात उल्लेख करावा लागेल. याशिवाय त्यांनी 'महात्मा गांधी, काँग्रेस आणि भारताची फाळणी', 'भगवान', आपलं म्हणणारं कुणीतरी असावं', 'लेट अस लर्न मराठी' ही पुस्तकेही लिहिली आहेत. त्यांच्या 'बापू कुटी' या अनुवादास राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. आपल्या वडिलांवर त्यांनी 'ना चिरा ना पणती' हे पुस्तक लिहिले.

### ❐ डॉ. शेणोलीकर

पुणे येथे ८ जुलै रोजी डॉ. ह. श्री. शेणोलीकर (वय ८४) यांचे निधन झाले. डॉ. शेणोलीकर यांच्या निधनामुळे एका सव्यसाची समीक्षकाला आणि संतसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासकाला आपण मुकलो आहोत. सेवानिवृत्तीनंतर 'मराठी संत तत्त्वज्ञान : संज्ञाकोश' या प्रकल्पाची आखणी करणारे प्रा. शेणोलीकर हे तरुणाला लाजवेल अशा झपाट्याने काम करीत असत. त्यांचा जन्म जमखिंडीचा. पण शिक्षण पुण्यात झालेले. त्यांनी बेळगावला प्राध्यापकी सुरू केली. तेथून ते धुळ्याला गेले आणि धुळ्याला प्राध्यापक म्हणून काम करून निवृत्त झाल्यावर पुण्याला परतले. 'फर्ग्युसन'मधल्या 'साहित्य सहकार' च्या स्थापनेत व 'ज्ञानप्रकाश'च्या संपादनातही त्यांचा वाटा होता. बेळगावच्या नाट्यसंमेलनाचे ते चिटणीस होते आणि बेळगावच्याच वरेरकर नाट्यसंघाचे कार्याध्यक्षही. साहित्य परिषद, मराठी साहित्य महामंडळावर तर त्यांनी काम केलेच, पण मराठीचे व्यत्पन्न प्राध्यापक म्हणून त्यांनी केलेले काम खूप महत्त्वाचे होते.

एका बाजूला विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानतृष्णा निर्माण करीत असताना दुसरीकडे त्यांचे साक्षेपी संशोधन आणि लेखन चालू होते. संतसाहित्यावर त्यांचा विशेष भर होता. त्यातूनच 'ज्ञानेशांची अमृतवाणी' चे संपादन त्यांनी केले. तसेच 'नामयाची अमृतवाणी' ही संपादित केली. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या त्यांच्या अभ्यासातून 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप' हा ग्रंथ आकाराला आला. 'मायणीची मंजुळा' ही त्यांची कादंबरीही याच काळातली. 'महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास' हा त्यांचा ग्रंथही मत्त्वाचा होता. याखेरीज त्यांनी स्फुटलेखनही मोठ्या प्रमाणावर केले. त्यात प्रामुख्याने समीक्षात्मक लिखाणाचा समावेश होता. ही समीक्षाही त्यांनी एकारलेली राहणार नाही याची दक्षता घेतली होती. रसिकता लोपू न देण्याची काळजी घेऊन त्यांनी टीकालेखन केले. ललित साहित्य, संतसाहित्य, काव्य आदी विविध प्रांतांत त्यांनी लेखन केले. शिवाय अनेक ललित लेखही लिहून त्यांनी मराठी साहित्य समृद्ध केले. त्यांच्या निधनामुळे व्यासंगी रसिकवराचा लेखनप्रवास कायमचा थांबला आहे.